दैनिक
# संध्या
७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक
सोमवार, दि. ०४ मे २०२६
www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews
संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १२८ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

# नसरापूर प्रकरणाचा तपास एसआयटीकडे

**पुणे (दै. संध्या)**

नसरापूर येथे एका 65 वर्षांच्या नराधमाने चार वर्षांच्या चिमुरडीवर अत्याचार करून तिची हत्या केल्याची घटना घडली. या घटनेवरून लोकांमध्ये संताप वाढला असून नराधमाला फाशी द्या अशी मागणी केली जात आहे. आता या प्रकरणाचा तपास एसआयटी करणार आहे. नसरापूर घटनेचा तपास करण्यासाठी राज्य सरकारकडून स्पेशल इन्व्हेस्टिगेशन टीम तयार करण्यात आली आहे. नसरापूरच्या घटनेनंतर लोकांमध्ये मोठ्या प्रमाणात संताप निर्माण झाला आहे. नसरापूरमधील नागरिकांनी शनिवारी पुण्यातील नवले पूर बंद केला होता. त्यानंतर लोकभावना लक्षात घेऊन या प्रकरणाचा तपास लवकरात लवकर करण्यासाठी सरकारकडून हालचाल केली जात आहे. नसरापूर प्रकरणी स्थापन करण्यात आलेल्या एसआयटीमध्ये सहा अधिकाऱ्यांचा समावेश आहे. त्यापैकी दोन अधिकारी या महिला आहेत. पुणे ग्रामीण



## सहा अधिकाऱ्यांची टीम स्थापन

पोलिसांतील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा या एसआयटीमध्ये समावेश आहे.

पुण्यातील नसरापूर येथे 1 मे रोजी एक धक्कादायक घटना घडली. एका 65 वर्षीय व्यक्तीने, घरासमोर खेळणाऱ्या चिमुकलीला गोठ्यात नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. नंतर दगडाने ठेचून तिला निर्घृणपणे संपवलं आणि नंतर तिचा मृतदेह शेणाच्या ढिगाऱ्याखाली झाकून ठेवला. दुपारी चिमुकली न दिसल्यानं तीची शोधाशोध केल्यानंतर चिमुकली गोठ्यात मृत अवस्थेत आढळली. त्यानंतर परिसरातले सीसीटीव्ही फुटेज चेक केल्यानंतर आरोपी चिमुकलीला गोठ्याच्या दिशेने घेऊन जाताना दिसला. त्यानंतर हा प्रकार उघडकीस आला.

नराधम आरोपीने वासरू दाखवतो म्हणून हात धरून त्या चिमुकलीला गोठ्यात नेलं आणि तिच्यावर अत्याचार केला. आजीकडे उन्हाळ्याच्या सुट्टीसाठी आलेल्या या मुलीच्या कुटुंबीयांनी आपल्याच मुली सोबत असं कधी घडेल असा विचारही केला नव्हता. मात्र दुपारी साडेतीन वाजताचे ते सीसीटीव्ही फुटेज समोर आलं आणि अख्खं कुटुंब हादरलं. या घटनेनंतर गावकऱ्यांनी संताप व्यक्त करत पोलिसांना घेराव घातला. इतकं गंभीर कृत्य करूनही या नराधमाला त्याचा जराही पश्चाताप झालेला नाही. ग्रामस्थांनी त्याला चोप देऊन पोलिसांच्या ताब्यात दिलं. तरीही आपण काहीही चुकीचं केलेलं नाही, असा दावा या नराधमाने कोर्टात केला. शनिवारी पोलिसांनी त्याला कोर्टात हजर केलं. यावेळी युक्तिवादही नराधमाच्या समोरच झाला. मग न्यायाधीशांनी या नराधमाला प्रश्न विचारला, तुमची केस नेमकी काय आहे माहिती आहे का? त्यावर या नराधमाने अक्षरश: संताप येईल, असं उत्तर दिलं. ही मारामारीची किरकोळ केस आहे, असं हा असूर कोर्टात म्हणाला. या प्रकरणातील नराधमाला कोर्टाने 5 दिवसांची कोठडी सुनावणी आहे.

### चिमुकलीच्या वडिलांची भूमिका

या प्रकरणातील चिमुकलीवर शनिवारी रात्री उशिरा अंत्यसंस्कार करण्यात आले. यानंतर तिच्या वडिलांनी मोठी भूमिका घेतली आहे. मुलीला न्याय मिळेपर्यंत नेते मंडळींनी आम्हाला भेटायला येऊ नये, असं तिच्या वडिलांनी म्हटलं आहे. पुढारी येऊन फोटो काढून राजकारण करत आहेत, असंही ते म्हणाले.

# ‘सेल्फी’ साठी कनेक्टिंग लिंकवर थांबू नका; सीसीटीव्हीची नजर राहणार


**मुंबई (दै. संध्या)**



यशवंतराव चव्हाण मुंबई -पुणे द्रुतगती मार्गावरील कनेक्टिंग लिंक (मिसिंग लिंक) लोकार्पणानंतर वाहतुकीसाठी सुरू करण्यात आली आहे. मात्र, प्रवासादरम्यान सेल्फी, फोटो, घेण्यासाठी वाहन चालक केबल स्टेड ब्रिज व बोगद्याजवळ वाहने थांबवत असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे. द्रुतगती मार्गावर वाहने थांबवण्यास परवानगी नसून वाहनधारकांसाठी अपघाताचा धोका असल्याने ते टाळावे, असे आवाहन महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्यावतीने करण्यात येत आहे. महाराष्ट्र दिनी रोजी यशवंतराव चव्हाण मुंबई-पुणे मार्गावरील कनेक्टिंग लिंक अर्थात मिसिंग लिंकचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह अन्य मान्यवरांच्या हस्ते लोकार्पण झाले. महामार्ग पोलिसांनी अधिसूचनेद्वारे मुंबई-पुणे कनेक्टिंग लिंक प्रकल्पासाठी वेग मर्यादा जाहीर केली आहे. तसेच बोगद्यात हलक्या मोटार वाहनांसाठी ताशी १०० किमी वेग मर्यादा आणि बस व प्रवासी वाहनांसाठी ताशी ८० किमी वेग निश्चित केला आहे. कनेक्टिंग लिंक प्रकल्पातील दोन बोगदे व दोन पुलावर पूर्णपणे २४x७ सीसीटीव्ही यंत्रणेचे लक्ष आहे. यावर देखरेख ठेवण्यासाठी स्वतंत्र नियंत्रण कक्ष असून द्रुतगती मार्गावर थांबणाऱ्या गाड्यांची माहिती महामार्ग पोलिसांना दिली जाणार आहे. सेल्फी, फोटो आणि रिल काढण्यासाठी थांबू नका, नाहीतर मोठ्या दंडाची आकारणी होऊ शकते. तसेच तुमच्यासह इतरांच्याही वाहनांना धोका होऊ शकतो. या कारणास्तव, नियमांचे पालन करा आणि सुरक्षित, सुखकर प्रवास करा, असे आवाहन महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या वतीने करण्यात येत आहे.

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com

## ढिंग-टांग




# नसरापूर प्रकरणी राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाची गंभीर दखल

**मुंबई (दै. संध्या)**

नसरापूर येथे अल्पवयीन बालिकेसंदर्भात घडलेली घटना अत्यंत दुर्दैवी आणि संतापजनक आहे. या घटनेची महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने गंभीर दखल घेतली आहे. या प्रकरणात आरोपीला कायद्याच्या चौकटीत जास्तीत जास्त शिक्षा मिळावी आणि पीडित बालिकेला न्याय मिळावा यासाठी आयोग राज्य शासनाला महत्त्वपूर्ण शिफारशी करणार आहे. या प्रकरणात न्यायप्रक्रिया जलदगतीने पार पडावी यासाठी विशेष सरकारी वकील नियुक्त करण्याची आणि सदर प्रकरण फास्ट ट्रॅक न्यायालयात चालविण्याची शिफारस करण्यात येणार असल्याची माहिती राज्य बाल हक्क आयोगाचे अध्यक्ष संजय पुराणिक यांनी दिली आहे. बालिकेच्या कुटुंबियांना आवश्यक ते सर्व सहकार्य राज्य शासनामार्फत उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसेच आयोगाकडून स्थानिक प्रशासनाशी सतत संपर्क ठेवून घटनेची सविस्तर माहिती घेतली जात असून आवश्यक त्या सूचना देखील दिल्या जात आहेत. या घटनेनंतर नागरिकांमध्ये निर्माण झालेला संताप समजण्यासारखा असला तरी कायदा आणि सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी नागरिकांनी शांतता राखावी, असे आवाहनही आयोगाचे अध्यक्ष यांनी केले आहे. बालिकेला आणि तिच्या कुटुंबियांना लवकरात लवकर न्याय मिळावा यासाठी आयोगाकडून सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येणार आहेत.

स्वच्छ बालस्नेही महाराष्ट्राचे बालमतांच्या सन्मानाचे
बाल हक्क संरक्षण आयोग
महाराष्ट्र शासन

- आरोपीला कठोर शिक्षा देण्यासाठी विशेष सरकारी वकिलाची शिफारस करण्यात येणार - राज्य बाल हक्क आयोगाचे अध्यक्ष संजय पुराणिक

# सर्व सुविधायुक्त प्रशासकीय इमारतीसाठी १०० कोटी रुपयांचा निधी

*विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी कार्यालयासाठी सर्व सुविधायुक्त प्रशासकीय इमारत मार्च २७ पर्यंत पूर्ण करा – मुख्यमंत्री देवेंद्र*

**नागपूर (दै. संध्या)**

- ग्रीन, उष्णतामान रोधक व पर्यावरणस्नेही इमारत




जिल्हाधिकारी कार्यालय, विभागीय आयुक्त कार्यालय तसेच इतर कार्यालयांसाठी 12 मजली सुसज्ज अशी प्रशासकीय इमारत बांधण्यात येत असून, या इमारतीचे बांधकाम करताना पर्यावरण संवर्धनासोबतच वृक्षारोपण व ग्रीन बिल्डिंगची संकल्पना प्राधान्याने राबवा, या इमारतीचे बांधकाम अत्यंत उच्च दर्जाचे असावे, अशी सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. या इमारतीचे बांधकाम निर्धारित वेळेत म्हणजेच मार्च 27 पर्यंत पूर्ण करा. यासाठी आवश्यक असलेला शंभर कोटी रुपयांचा निधी तात्काळ मंजूर करण्यात येईल, असेही यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात असलेल्या सुमारे तीन एकर जागेवर १२ मजली सुसज्ज आणि सर्व सुविधायुक्त इमारतीचे बांधकाम सुरू असून, या प्रकल्पाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भेट देऊन पाहणी केली. तसेच इमारतीच्या बांधकामासंदर्भात माहिती घेतली. त्यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

यावेळी आमदार प्रवीण दटके, विभागीय आयुक्त श्रीमती विजयालक्ष्मी बिदरी, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, निवासी उपजिल्हाधिकारी अनुप हांडे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे नरेश बोरकर, कार्यकारी अभियंता ऋतुजा वंजारी, संतोष जाधव, कंत्राटदार विलास बिदारे आदी उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळामार्फत या इमारतीचे बांधकाम करण्यात येत असून या इमारतीसाठी 271 कोटी 34 लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. सुमारे 32867km² चटई क्षेत्र असलेली ही इमारत 12 मजली असून, संपूर्ण इमारत ग्रीन बिल्डिंग म्हणून तयार करण्यात येत असल्यामुळे 125 किलो वॅट सोलरची सुविधा आहे. येथील उन्हाळ्यातही या इमारतीमध्ये उष्णता रोधक व्यवस्था राहणार आहे. या इमारतीमध्ये दोन टॉवर असून, स्वतंत्र वाहन तळ, 500 क्षमतेचे सभा कक्ष, कॉन्फरन्स हॉल आणि संपूर्ण इमारत वातानुकूलित असल्यामुळे उन्हाचा त्रास होणार नाही. या इमारतीसाठी आठ लिफ्ट असून जिल्हाधिकारी कार्यालय व आयुक्त कार्यालय तसेच संबंधित शासकीय कार्यालयांसाठी आवश्यक असलेल्या सर्व सुविधा येथे उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. या इमारतीच्या बांधकामा अंतर्गत येणाऱ्या वृक्षांबाबत उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार येथील वृक्षांचे पुनर्रोपण यशस्वीपणे पूर्ण करण्यात आले असून, 2000 पेक्षा जास्त झाडे लावण्यात आली आहेत. ही इमारत मार्च 27 पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. सध्या इमारतीच्या बेसमेंट व पहिल्या मजल्याचे काम पूर्ण झाले असून दिलेल्या वेळेत ही इमारत पूर्ण करण्यात येईल, अशी माहिती अधीक्षक अभियंता नरेश बोरकर यांनी दिली. या इमारतीसाठी निधी उपलब्ध असला तरी अंतिम टप्प्यात लागणाऱ्या 100 कोटी रुपयांच्या निधी संदर्भात यावेळी त्यांनी माहिती दिली.

## ब्रेकिंग न्यूज



### न्याय मिळवून देण्यास सरकार कटिबद्ध

मुंबई (दै. संध्या) : नसरापूर येथे अल्पवयीन बालिकेसंदर्भात घडलेली घटना अत्यंत दुर्दैवी आणि संतापजनक असून या प्रकरणाची राज्य शासनाने गंभीर दखल घेतली आहे. पीडित बालिकेला लवकरात लवकर न्याय मिळावा आणि आरोपीला कायद्याच्या चौकटीत कठोर शिक्षा व्हावी, यासाठी शासन कटिबद्ध असल्याची माहिती महिला व बालविकास राज्यमंत्री मेघना साकोरे – बोर्डीकर यांनी दिली. या प्रकरणातील न्यायप्रक्रिया जलदगतीने पार पडावी यासाठी विशेष सरकारी वकील नियुक्त करण्याबाबत तसेच खटला फास्ट ट्रॅक न्यायालयात चालविण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून देण्यात आले आहेत. पीडित बालिकेच्या कुटुंबियांना शासनामार्फत सर्वतोपरी मदत आणि सहकार्य उपलब्ध करून देण्यात येईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

## बीडमध्ये राड्यानंतर जरांगेंची थेट भूमिका; केसेसची पर्वा नाही, इशाऱ्याने खळबळ

# जे व्हायचंय ते होऊ द्या : मनोज जरांगेंचा इशारा

**बीड (दै. संध्या)**



बीड जिल्ह्यातील नेकनूर येथे घडलेल्या तणावपूर्ण घटनेनंतर मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी केलेल्या वक्तव्यामुळे पुन्हा एकदा राजकीय आणि सामाजिक वातावरण ढवळून निघाले आहे. दोन गटांमध्ये झालेल्या दगडफेकीच्या पार्श्वभूमीवर जरांगेंनी ठाम भूमिका घेत, जे व्हायचंय ते होऊन जाऊ द्या, असा सूचक इशारा दिला. त्यांच्या या विधानामुळे चर्चांना उधाण आले असून, परिस्थिती अधिक गंभीर होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. नेकनूर येथे हरिनाम सप्ताहाच्या सांगता कार्यक्रमादरम्यान किरकोळ कारणावरून वाद निर्माण झाला. एका वाहनाचा धक्का लागल्याच्या मुद्द्यावरून सुरू झालेला वाद काही वेळातच वाढला. रिक्षा चालक आणि दुचाकीस्वार यांच्यातील बाचाबाचीने उग्र रूप धारण केले. या वादात महिलांसह लहान मुलालाही मारहाण झाल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेचे सीसीटीव्ही फुटेजही समोर आले असून, त्यातून घटनेची तीव्रता स्पष्ट होते.

घटना वाढत गेल्यानंतर दोन्ही गट आमनेसामने आले आणि एकमेकांवर दगडफेक सुरू झाली. परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाण्याची शक्यता लक्षात घेऊन पोलिसांनी तातडीने हस्तक्षेप केला. मोठ्या प्रमाणावर पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला. शांतता भंग केल्याप्रकरणी पोलिसांनी 30 जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, 11 जणांना ताब्यात घेतले आहे. या कारवाईनंतर परिसरात तणाव कायम असला तरी सध्या परिस्थिती नियंत्रणात असल्याचे सांगितले जात आहे.

दरम्यान, या घटनेच्या पार्श्वभूमीवर नेकनूर येथे आलेल्या मनोज जरांगे पाटील यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. आमच्यावर कितीही केसेस दाखल झाल्या तरी आम्हाला त्याची भीती नाही. आम्हाला नोकऱ्या लागणार नाहीत. जे व्हायचंय ते होऊ द्या, असे त्यांनी ठामपणे सांगितले. त्यांच्या या वक्तव्यामुळे त्यांच्या समर्थकांमध्ये उत्साह निर्माण झाला, तर विरोधकांनी यावर टीका केली आहे.

तथापि, त्यांनी केवळ इशाराच दिला नाही तर समाजाला शांततेचे आवाहनही केले. सर्व समाजातील लोक एकत्र गुण्यागोविंदाने राहतात. फक्त दोन-चार लोक चुकीचे वागतात म्हणून संपूर्ण समाजाला दोष देणे चुकीचे आहे, असे ते म्हणाले. त्यांनी दोन्ही गटांना संयम बाळगण्याचे आणि परिस्थिती अधिक बिघडू न देण्याचे आवाहन केले. या संपूर्ण प्रकरणानंतर दोन्ही समाजातील नागरिकांनीही शांततेचा मार्ग स्वीकारण्याचे संकेत दिले आहेत. दरम्यान, मनोज जरांगे पाटील हे बंकटस्वामी संस्थानच्या अखंड हरिनाम सप्ताहाच्या सांगता कार्यक्रमासाठी नेकनूरमध्ये आले होते. त्यावेळी त्यांनी समाजात सलोखा राखण्याचे महत्त्व अधोरेखित केले. आता या प्रकरणानंतर पुढील काही दिवसांत परिस्थिती कशी विकसित होते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# ‘एलआयटी’ जगाला उत्तम अभियंते देईल : देवेंद्र फडणवीस



**नागपूर (दै. संध्या)**

आठ दशकांपासून कार्यरत असलेल्या ‘एलआयटी’चे विद्यार्थी आज जगभरात आहेतच, परंतु भविष्यातही देशाला व जगाला उत्तम अभियंते देण्याचे काम लक्ष्मीनारायण अभिनव तंत्रज्ञान विद्यापीठ करेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

लक्ष्मीनारायण अभिनव तंत्रज्ञान विद्यापीठाच्या (एलआयटी) विविध शैक्षणिक व प्रशासकीय सुविधांच्या एकत्रित बांधकामाचे भूमिपूजन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते झाले, त्यानंतर ते बोलत होते. यावेळी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, महापौर नीता ठाकरे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. काही वर्षांपूर्वी या संस्थेला विद्यापीठाचा दर्जा दिल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, त्यामुळे दर्जा तर वाढलाच परंतु, आता येथे भव्य व सुंदर शैक्षणिक संकुल उभारण्यात येणार आहे. एक आंतरराष्ट्रीय दर्जाचे शैक्षणिक केंद्र म्हणून या विद्यापीठाची ओळख असेल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. दीप प्रज्वलनानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी भूमिपूजन केले. कुलगुरू डॉ. अतुल वैद्य यांनी प्रास्ताविक केले. लक्ष्मीनारायण इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (एलआयटी) या संस्थेला मुख्यमंत्र्यांनी विद्यापीठाचा दर्जा दिला त्यानंतर या संस्थेचे नाव लक्ष्मीनारायण अभिनव तंत्रज्ञान विद्यापीठ झाल्याचे डॉ. वैद्य यांनी सांगितले. सौरभ जोगळेकर यांनी संचालन केले. कुलसचिव डॉ. नीरज खटी यांनी आभार मानले. आमदार विकास ठाकरे, आमदार कृपाल तुमाने, विद्यापीठाच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष डॉ. गणपती यादव, प्रमुख सल्लागार मोहन पांडे प्रभृती यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते.

## संपादकीय

# समाज परिवर्तनासाठी समर्पित आयुष्याची समिधा !

जैन समाजाप्रमाणेच हिंदूसह अन्य धर्मीयांमध्ये लाखोंच्या संख्येने अनुयायी असलेल्या, तसेच केवळ धार्मिक प्रवचनेच नव्हे तर समाज सुधारणा आणि सामाजिक क्रांतीच्या दिशेने समाजाला प्रवृत्त करणाऱ्या थोर जैन साध्वी प्रीतीसुधाजी म.सा. यांचे संथारा व्रत ग्रहण केल्यानंतर देवलोक गमन झाले. ही केवळ जैन समाजाचीच नव्हे, तर समस्त देशवासीयांची अपरिमित हानी आहे. लौकिक अर्थाने जैन श्रमण संघाचे आचार्यश्री हे पद त्यांना प्राप्त झाले नसले, तरी समस्त समाजमनात अनेक दशकांपासून एका अर्थाने त्या आचार्य पदावरच स्थानापन्न होत्या. नाशिक जिल्ह्यातील पिंपळगाव बसवंतच्या सोनी कुटुंबात साध्वी प्रीतीसुधाजी म.सा. यांचा जन्म झाला. बालवयापासूनच त्यांच्यात वैराग्याची प्रेरणा होती. आयुष्यभर हजारो प्रवचनांतून, भजनांतून जैन स्थानकांमधील लोकसंपर्कातून समाजसुधारणेचे सूत्र त्यांनी कायम ठेवले होते. जैन धर्माच्या प्रवचनांखेरीज संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीवर वारकरी संप्रदायासह सर्वधर्मीय बांधवांसमोर त्यांनी जाहीर प्रवचने दिली आहेत. साहजिकच त्यांचे कर्तृत्व एक धर्म अथवा संप्रदायापुरते मर्यादित न राहाता त्यांनी समस्त भारतवासीयांनाच सत्कर्मासाठी प्रवृत्त केले. त्यांच्या प्रवचनांच्या प्रभावामुळे अनेक कुटुंबातील भावाभावातले, भावा-बहिणीतले वाद संपुष्टात आले. इतकेच नव्हे, तर माता-पित्यांना आपल्यापासून दूर ठेवणाऱ्या, वृद्धत्वात त्यांची काळजी न घेणाऱ्या अनेक मुलांनी त्यांची प्रवचने ऐकून स्वतःची चूक मान्य केली व आई-वडिलांना पुन्हा घरात मानाचे स्थान दिले, अशा शेकडो घटना आहेत. रूढ अर्थाने त्यांची प्रवचने धार्मिक होती, तरी त्यात सातत्याने सामाजिक आणि कौटुंबिक वीण घट्ट विणण्याचा धागा गुंफलेला असायचा. १९७३ मध्ये साध्वी प्रीतीसुधाजी म.सा. यांची दिल्लीत रामलीला मैदानावर प्रवचने झाली. त्यावेळी त्या जैन धर्माचे थोर आचार्य सुशील मुनी यांच्या संपर्कात आल्या. आचार्यजींनी साध्वी प्रीतीसुधाजी म.सा. यांची मधुर वाणी आणि अर्थपूर्ण रसाळ प्रवचनांचे कौतुक केले. त्यानंतर, दीड दशकाने अमेरिकेतल्या जैन धर्मातल्या पुढच्या पिढीला देखील मार्गदर्शनाची गरज आहे, याची जाणीव करून देत आचार्य सुशीलमुनींच्या प्रेरणेनुसार सिद्धाचलम आश्रम, तसेच अमेरिकेतल्या विविध भागांत धर्मोपदेश व मार्गदर्शन करण्यास साध्वी मधुस्मिताजी व साध्वी जयस्मिताजी म.सा. या अमेरिकेत गेल्या. त्यानंतर, त्या भारतात परत आल्या, तेव्हा रूढी परंपरांना अधिक महत्त्व देणाऱ्या काही समाजबांधवांनी त्यांना जैन स्थानकात प्रतीकात्मक प्रवेशबंदी केली. साधू-साध्वींनी विदेशात जाणे, समुद्र ओलांडणे निषिद्ध मानणाऱ्या रूढीवादींच्या विरोधात त्यावेळी स्वरूपचंद राका, सुरेश भटेवरा, रमेशचंद बाफणा, बिरदीचंद नहार यांच्यासह काही अन्य समाज धुरिणांनी एकत्र येऊन एक चळवळ उभारली. जैन समाजात अलीकडच्या काळातली ही लक्षवेधी चळवळ ठरली. नाशिकमधील सत्कार सोहळ्यानंतर मिरवणुकीने दोन्ही साध्वी कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांचे आशीर्वाद घेऊन पुन्हा अमेरिकेला रवाना झाल्या. कर्मठ रूढींना फाटा देण्याच्या या उपक्रमाला प्रीतीसुधाजी म.सा. यांचे अप्रत्यक्ष आशीर्वाद होते. त्यानंतर, दोनच वर्षांनी १९९४ मध्ये नागपूरला मी पुढाकार घेऊन साध्वी प्रीतीसुधाजी म.सा. आणि साध्वी मधुस्मिताजी म.सा. व अन्य साध्वींचा अतिभव्य चातुर्मास आयोजित केला. सहसा एका व्यासपीठावर न येणाऱ्या जैन धर्मातल्या सर्व पंथांना त्या चातुर्मासाने एकत्र आणण्याचे मोठे कार्य केले. त्या चातुर्मासाचे वैशिष्ट्य म्हणजे त्याच्या स्वागत समितीचे अध्यक्षपद नागपूरचे तत्कालीन महापौर सरदार अटलबहादुरसिंग या शीख बांधवाने भूषवले आणि भव्य मंडपाची जबाबदारी जाफरभाई नावाच्या मुस्लीम बांधवाने घेतली होती. वातावरण इतके भारावलेले होते की, तो पूर्ण काळ या दोघांनीही शाकाहारासह सर्व जैन संस्कारांचे पालन केले. या चातुर्मासाचे नाव होते 'संस्कारयज्ञ'.

## संस्कृत सुभाषित

न स्वप्नेन जयेन्निद्रां, न कामेन जयेत् स्त्रियम।
नेन्धनेन जयेदग्नि, न पानेन जयेत् सुरा ॥

अर्थ – अतिनिद्रेची इच्छा बाळगून निद्रेवर विजय मिळवता येत नाही. स्त्रीची कामवासना कामोपभोगाने शमत नाही, उलट ती वाढते, अग्नीत जळण घातल्याने तो जास्त भडकतो. अतिमद्यपानाची आसक्ती धरून मद्यपानाची इच्छा शमत नाही, उलट ती भडकते. भोगाचा अतिरेक केल्याने भोगाची इच्छा वाढतच जाते.

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ९३८

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | 9 | 1 | | | | | | |
| | | 4 | 5 | 1 | | | 2 | |
| | 5 | | | | 8 | | | 1 |
| 4 | | | 2 | 6 | 5 | | | 3 |
| 6 | | 7 | 9 | | 4 | 2 | | 5 |
| 5 | | | 8 | 7 | 1 | | | 4 |
| 1 | | | 3 | | | | 5 | |
| | 6 | | | 8 | 7 | 4 | | |
| | | | | | | 6 | 1 | 9 |

### : सूडोकु :


**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ९३७ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 3 | 7 | 6 | 5 | 1 | 2 | 9 | 8 |
| 5 | 9 | 1 | 2 | 7 | 8 | 3 | 4 | 6 |
| 6 | 8 | 2 | 4 | 9 | 3 | 5 | 1 | 7 |
| 2 | 7 | 4 | 8 | 3 | 9 | 6 | 5 | 1 |
| 8 | 6 | 5 | 1 | 2 | 4 | 9 | 7 | 3 |
| 3 | 1 | 9 | 7 | 6 | 5 | 8 | 2 | 4 |
| 1 | 2 | 3 | 9 | 4 | 6 | 7 | 8 | 5 |
| 9 | 5 | 8 | 3 | 1 | 7 | 4 | 6 | 2 |
| 7 | 4 | 6 | 5 | 8 | 2 | 1 | 3 | 9 |

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ९३८



**आडवे शब्द**
१. अभिनयकलेचा बादशहा, नटश्रेष्ठ
६. राजमहाल
९. दरवाजा
११. लेमनग्रास म्हणजे --- चहा
१२. माजलेला
१३. शपथ
१४. छाती
१६. भांडणाची कळ
१८. लठ्ठ, स्थूल
१९. कडक, न दबणारे
२१. '-- मुखी परमेश्वर'
२३. शिर्डीचे संत
२५. चलती, उत्कर्ष
२७. गोधनाचे दान
२९. आवाज, नाद
३१. बोजा, वजन
३२. केव्हा (ग्रा.)
३३. मौजा, गंमत
३४. नेमस्त धोरण
३६. देऊन टाकणे, त्याग करणे
३८. परंपरागत
४०. चोरटा आवाज
४१. व्रताच्या उद्यापनानंतरचे दान
४४. मग्न, गुंग, रममाण
४५. शंकराचे एक नाव
४६. प्रत्येक, दर
४७. वाळा, ४९. बगळा
५१. श्रीमंत
५४. चणचण, न्यूनता
५६. जमीन
५७. अहंकार, गर्व
६०. संपत्ती, पैसाअडका
६१. समुद्र
६३. राजाची मुलगी
६५. तरटाची वनस्पती
६६. बोकड
६७. मागणारा
६८. चिवचिवाट
६९. सुविधा
७०. हमाल (हिंदी)
७१. रानटी
७३. काही न करता वर्षागणिक वाढणारे
७४. लेंगा
७६. बोलविणे
७७. सततची गर्दी
७९. सुंदर तरुणी
८०. नजरेचा तीर
८१. करवंद

**उभे शब्द**
१. निम्मे झालेले
२. पर्वत
३. मुसलमान
४. दक्षकन्या
५. डोक्यावर मारलेल्या चापट्या
६. योग्य
७. तारुण्य (हिंदी)
८. डाळिंब्या
९. सेवक
१०. रेंगाळत, --- गमत
१२. अभिप्राय, धारणा
१३. ज्वारीची वाळलेली ताटे
१५. अत्यंत थोडा वेळ
१६. सापळा, पेच
१७. एकत्र बांधलेला ऐवज
१८. दोन सुगंधी पांढरी फुले
२०. हात
२१. मर्यादा
२२. देवाणघेवाण
२४. पोते
२६. पिशाच्याला ठेवलेले अन्न
२८. पुरुष
३०. सिंह
३१. हमाल
३३. मान ----
३३अ. खूप, पुष्कळ
३५. माणुसकी
३७. प्रहार
३९. घाव
४०. कबूतर
४२. मऊ
४३. शक्कर
४८. एक तारवाद्य
५०. त्रिदोषातील थंडीत वाढणारा दोष
५२. लिहिणारा प्रतिभावंत
५३. भविष्य सांगण्याची एक विद्या
५५. थेट, सरळ
५८. कीव करण्यासारखी स्थिती
५९. नंतर
६०. छोटे धनुष्य
६१. मला (कवितेत)
६२. मुंबईचा घरगडी
६३. युवराज
६४. कोर्ट, अदालत
६५. दह्याचे पेय
६६. हुशार (हिंदी)
६९. लग्न, नातेसंबंध
७२. उशीराने पिकणारे धान्य, रास ---
७४. जल
७५. लोक
७६. आई
७७. ओले खोबरे
७८. निवारा

**जम्बो शब्दकोडे क्र. ९३७ चे उत्तर**

आडवे उत्तर : १.सान ३.उपटसुंभ ७.पिनाक ११.यमुना १३.लंका १४.टन १६.चळवळ १८.नातलाग १९.एकंदर २१.वरद २३.भोवती २४.हिवाळा २६.तंगडतोड २९.निवारा ३०.टेकू ३१.डर ३३.उदासी ३४.टाप ३५.वाजवी ३७.आसरा ३८.जाच ४०.जनावर ४३.लय ४४.भव ४६.टर ४७.कवन ४८.बंदिवान ४९.वैफल्य ५०.कोडगा ५१.गैदी ५२.रीस ५३.गडप ५५.हजार ५८.रव ५९.शान ६०.हवालदार ६१.साईबाबा ६३.शस्त्र ६४.काज ६५.बाल्य ६६.उपरती ६७.न्यारा

उभे उत्तर : १.साय २.नमुना ४.पलंग ५.टका ६.भटकंती ८.नाच ९.कळवळा १०.हळदकुंकू १२.नातवंड १५.नद १७.वर १९.एवढा २०.रहिवासी २२.वितंडवाद २५.वारा २७.गरज २८.तोरा २९.निदान ३०.टेप ३२.धूसर ३४.टाच ३६.वीज ३७.आवर ३८.जायबंदी ३९.पावन ४१.नाट ४२.अवगाहन ४४.भवानी ४५.साफसफाई ४७.कड ४९.वैरी ५०.कोप ५१.गैरहजर ५३.गरबा ५४.डव ५६.लालसा ५७.हरभरा ५९.शास्त्र ६१.साम्य ६२.बाई ६३.शल्य ६४.काप

## आगामी साप्ताहिकी

४ मे २०२६ सोमवार

५ मे २०२६ मंगळवार
अंगारक संकष्ट चतुर्थी
चंद्रोदय १०.१८
मुंबई २२.१८
अकोला २१.०६
अमरावती २२.०३
अहमदनगर २२.३०
अलिबाग २२.१८
औरंगाबाद २२.१९
कोल्हापुर २२.०७
जळगाव २२.१३
जालना २२.०८
ठाणे २२.१९
धराशिव २२.०३
धुळे २२.१६
नांदेत्रड २२.००
नागपूर २१.५८
नाशिक २२.१७
पणजी २२.०६
परभणी २२.०३
पुणे २२.१३
बेळगाव २२.०४
बीत्रड २२.०७
बुलढाणा २२.०७
भंडारा २१.५६
भुसावळ २२.१२
यवतमाल २२.००
रत्नागिरी २२.१२
लातूर २२.०३
वर्धा २१.५९
सांगली २२.०७
सातारा २२.०९
सोलापूर २२.०३
सावंतवाडी २२.०७

६ मे २०२६ बुधवार

७ मे २०२६ गुरुवार
संत चोखमेळा पुण्यतिथी

८ ऑगस्ट २०२६ शुक्रवार
रवींद्रनाथ टागोर जयंती
जागतिक रेडक्रॉस दिन

९ मे २०२६ शनिवार
कालाष्टमी
धनिष्ठानवकारंभ
रात्रौ ११.२३ नंतर
महाराणा प्रताप
जयंती (तारेखप्रमाणे)

१० मे २०२६ रविवार
शुभ दिवस

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १४९३ – पोप अलेक्झांडर सहाव्याने नवे जग स्पेन व पोर्तुगालमध्ये वाटुन दिले.
- १४९४ – क्रिस्टोफर कोलंबस जमैकाला पोचला.
- १६२६ – डच शोधक पीटर मिनुइत न्यू ॲम्स्टरडॅम (आत्ताचे मॅनहॅटन) येथे पोचला.
- १८१४ – नेपोलियन बोनापार्ट हद्दपारीची शिक्षा भोगण्यासाठी एल्बा येथे पोचला.
- १८६९ – हाकोदातेची लढाई.
- १९०४ – अमेरिकेने पनामा कालव्याचे काम सुरू केले.

### राष्ट्रीय

- २००८ – इंग्लंडवासियांना दर्जेदार आरोग्य सेवा पुरविणारे मूळ भारतीय वंशाचे लॉर्ड खलिद हमीद यांनी २००७ सालचा प्राईड ऑफ इंडिया पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.


### जन्म

- १००८ – हेन्री पहिला, फ्रांसचा राजा याचा जन्म.
- ११३१ – महात्मा बसवेश्वर, मध्यकालीन थोर समाजसुधारकाचा जन्म.
- १६५४ – कांग्क्सी, चीनी सम्राटचा जन्म.
- १९२८ – होस्नी मुबारक, ईजिप्तचा पंतप्रधान याचा जन्म.
- १९५७ – पीटर स्लीप, ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटूचा जन्म.
- १९६० – मार्टिन मॉक्सॉन, इंग्लिश क्रिकेटपटूचा जन्म.
- १९७० – पॉल वाईझमन, न्यूझीलंडचा क्रिकेटपटूचा जन्म.

### निधन

- १५०६ – हुसेन बयकराह, हेरतचा राजाचे निधन.
- १७९९ – टिपू सुलतान यांचे निधन
- १९८० – जोसोफ ब्रोझ टिटो, युगोस्लाव्हियाचा राष्ट्राध्यक्षाचे निधन.

## उपदेशकथा



### एडिसन

जगदविख्यात शास्त्रज्ञ थॉमस अल्वा एडिसन यांच्या प्रयोगशाळेला १९१४ मध्ये आग लागली. या आगीत त्यांनी आयुष्यभर केलेल्या संशोधनाची कागदपत्रे, यंत्रसामग्री जळून खाक झाली. या आगीची वार्ता समजताच त्यांचा मुलगा चार्ल्स एडिसन त्यांना भेटायला, मदत करायला धावत आला तेव्हा थॉमस एडिसन त्याला म्हणाले, '' अरे पाहत काय उभा राहिलास ? तुझ्या आईला चटकन बोलावून आण. असे दृश्य पुन्हा पाहायला मिळणार नाही.'' दुसऱ्या दिवशी आपल्या आशा – आकांक्षांची आणि स्वप्नांची झालेली ती राखरांगोळी पाहताना ते म्हणाले, '' सारी सामुग्री नष्ट होण्याचे खूप फायदे झाले. त्यामुळे माझ्या चुकाही जळून खाक झाल्या. आता मी नव्या जोमाने कामाला सुरुवात करु शकेन. एका अर्थी ही परमेश्वराची कृपाच म्हणायची !''

## : SMS :

Ladki ek aisi paheli hai, kabhi teri to kabhi meri saheli hai. Kharcha karo to bole "darling, how are you?". Na karo to bole "brother, who are you?".

## आजचे राशिभविष्य



**मेष :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा: उत्तर आपले काम सेवा या भावनेने करा. आर्थिक परिस्थिती मजबूत राहील.

**तूळ :** शुभ रंग : पिवळा, शुभ दिशा: पूर्व आज चांगल्या संधी आपणास मिळणार नाही. आर्थिक स्थिती चांगली राहील.

**वृषभ :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: उत्तर भौतिक सुख साधनाकरिता आपला पैसा खर्च होईल. दुसऱ्यांचा सल्ला आपल्याकरिता फायदेशीर राहील.

**वृश्चिक :** शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा:पूर्व निर्णय घेताना मर्यादा पाळा. कामकाजात अजचणी आल्यामुळे मन दु:खी राहील. निष्कारण शंकेमुळे बेचैन रहाल.

**मिथून :** मिथुन शुभ रंग: पांढरा: शुभ दिशा: पश्चिम आपले धैर्य आपल्या कुटुंबात व समाजात मान सन्मान मिळवून देणार आहे.

**धनू :** शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा:पूर्व पद, प्रतिष्ठेमध्ये वाढ होईल. मुलांच्या आरोग्याकडे लक्ष द्या. कोणत्यातरी रहस्याचा उलगडा होईल.

**कर्क :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: उत्तर भावनेने निर्णय घेऊ नका नुकसान होण्याची शक्यता आहे. आपल्या कामाचे चिज होणार नाही.

**मकर :** शुभ रंग: लाल, शुभ दिशा: उत्तर मनमिळावू स्वभावाचा आज आपल्याला फायदा होणार आहे. दुसऱ्यांची मदत फायदेशीर होईल.

**सिंह :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा:पूर्व आपली आर्थिक स्थिती उत्तम राहील. व्यापार वाढीकरिता योग्य प्रयत्न करा. सार्वजनिक स्थितीची आपल्याला चिंता राहील.

**कुंभ :** शुभ रंग: केसरी : शुभ दिशा: पश्चिम आजचा दिवस धावपळीचा राहील परंतु आर्थिक फायदा भरपूर होईल. आळस दूर करा.

**कन्या :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: उत्तर भौतिक साधने मिळण्याचे योग आहेत. मान सन्मान वाढणार आहे. पैसा अधिक खर्च होईल.

**मीन :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: पश्चिम आपल्या विचारांची दखल घेतली जाईल. अचानक लाभ होण्याचे योग आहेत.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३८.६ | २४.८ |
| अहमदनगर | ३८.१ | २३.८ |
| अकोला | ४३.१ | २९.६ |
| अमरावती | ४२.१ | २९ |
| बीड | ४४.२ | ३२.५ |
| भंडारा | ४३.२ | २९.७ |
| बुलढाणा | ३८.३ | २३.४ |
| चंद्रपूर | ४४ | ३१.२ |
| चेन्नई | ४८.२ | ३७.५ |
| नवी दिल्ली | ३९.५ | २५.८ |
| धुळे | ४१.६ | २५.६ |
| गोंदिया | ४२.७ | २९.५ |
| जळगाव | ४३.५ | २९.३ |
| कोल्हापूर | ३७.७ | २१.७ |
| लातूर | ३९ | २४.७ |
| मुंबई | ३८.३ | ३३.७ |
| नागपूर | ४३.८ | ३०.१ |
| नांदेड | ४१.३ | २७.१ |
| नंदूरबार | ३९.२ | २५.६ |
| नाशिक | ३७.९ | २३.७ |
| पुणे | ३५.३ | २१.१ |
| पंढरपूर | ३९.५ | २४.३ |
| सातारा | ३७.६ | २०.१ |
| सांगली | ३९.४ | २२.३ |
| सोलापूर | ४०.२ | २५.८ |
| वर्धा | ४३.५ | २९.९ |

## पंचांग



पंचांग
४ एप्रिल २०२६
सोमवार
विक्रम संवत्– २०८२
वैशाख शके
संवत्– १९४८
संवत्सर –पराभवनाम
अयन– उत्तरायणारंभ
मास– वैशाख
ऋतु– सौर ग्रीष्म
कृष्ण पक्ष
तिथि:तृतीया
२९:२४:३३+
नक्षत्र:अनुराधा
०९:५७:३६
योग:परिध २३:१९:१९
करण:वणिज १६:१२:१८
करण:विष्टि २९:२४:३३+
सूर्य:मेष
चन्द्र:वृश्चिक
हिजरी सन् – १४४५
मुस्लिम मास – जिल्काद
तारीख – १७

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### पुण्यात आठ वर्षांनी पाण्याच्या टाक्या कार्यान्वित

पुणे (दैनिक संध्या) : महापालिका हद्दीत समाविष्ट होऊनही गेली अनेक वर्षे पाण्यासाठी वंचित राहिलेल्या दक्षिण पुण्यातील नागरिकांसाठी अखेर दिलासादायक घडामोड घडली आहे. महंमदवाडी, उंड्री, एनआयबीएम आणि कोंढवा परिसरातील पाण्याच्या टाक्या तब्बल आठ वर्षांनंतर कार्यान्वित करण्यात आल्या असून, 1 मे रोजी मुख्य जलवाहिनीतून पाणी सोडण्यात आले. त्यामुळे सुमारे 4 लाख नागरिकांना टँकरवरच्या अवलंबित्वातून मुक्ती मिळण्याची आशा निर्माण झाली आहे. दोराबजी हेरिटेज मॉल परिसरात उभारण्यात आलेल्या तीन पाण्याच्या टाक्यांमध्ये आता पाणी भरण्यास सुरुवात झाली आहे. यामध्ये प्रत्येकी 30 लाख लिटर क्षमतेच्या दोन आणि 15 लाख लिटर क्षमतेची एक अशी एकूण 75 लाख लिटर साठवण क्षमता आहे. 2018-19 मध्ये सुरू झालेला हा प्रकल्प विविध तांत्रिक अडचणी आणि नियोजनातील त्रुटींमुळे रखडला होता. विविध वृत्तांच्या माध्यमातून केलेल्या पाठपुराव्यामुळे आणि 'समान पाणीपुरवठा योजने'अंतर्गत 19 कि.मी. मुख्य जलवाहिनी सुरू झाल्याने प्रकल्पाला गती मिळाली असून, 10 मेपर्यंत उर्वरित वितरण यंत्रणाही सुरू होण्याची अपेक्षा आहे. गेल्या 15 वर्षांपासून या भागातील नागरिकांना महापालिकेच्या पाण्याचा पुरवठा मिळत नव्हता. परिणामी, रहिवाशांना खासगी टँकर्सवर अवलंबून राहावे लागत होते. अनेक सोसायट्या दरमहा लाखो रुपये खर्च करत होत्या. या पार्श्वभूमीवर टँकर माफियांच्या हितसंबंधांमुळेच हा प्रकल्प रखडल्याचे आरोपही स्थानिकांकडून करण्यात येत होते. या प्रकल्पामुळे दररोज सुमारे 600 टँकर्सची गरज कमी होणार असून, नागरिकांना दिलासा मिळणार आहे. वेगाने वाढणाऱ्या नागरीकरणामुळे निर्माण झालेल्या पाणीटंचाईवर हा प्रकल्प महत्त्वाचा उपाय ठरणार आहे.




### रुग्णालयांत रक्ताचा तुटवडा; रक्तदान शिबिरे घटल्याचा परिणाम

पुणे (दैनिक संध्या) : शाळा-महाविद्यालयांना सुट्ट्या. उन्हाळ्याच्या सुट्ट्यांसाठी परगावी गेलेला मोठा वर्ग, रक्तदान शिबिरांची घटलेली संख्या यामुळे गेल्या काही दिवसांपासून रक्तदानाचे प्रमाण लक्षणीयरीत्या घटले आहे. त्याचा परिणाम म्हणून शहरातील विविध रुग्णालयांमध्ये रक्ताचा तुटवडा भेडसावत आहे. मे महिन्यात अशीच परिस्थिती कायम राहण्याची शक्यता आहे. दर वर्षी मार्च, एप्रिल आणि मे महिन्यात रक्तसंकलन कमी होत असते. शाळा महाविद्यालयांच्या परीक्षा आणि त्यानंतर उन्हाळी सुट्ट्यांचा काळ, परगावी गेलेला मोठा वर्ग यामुळे शहरांमध्ये रक्तदान शिबिरांची संख्या जेमतेम असते. या महिन्यांचा विचार केला, तर यंदा शहरात आतापर्यंत केवळ दोन ते तीनच मोठी शिबिरे झाली. शहराची गरज लक्षात घेता हा आकडा अगदीच तुटपुंजा आहे. पुणे शहराला दररोज अंदाजे १५०० रक्ताच्या पिशव्या लागतात. मात्र जेमतेम ७०० ते ८०० पिशव्यांची उपलब्धता असते. अशा वेळी नातेवाईकांना रक्त पेढ्यांमध्ये रक्त मिळवण्यासाठी धावपळ करावी लागते. मे महिन्यात कडक उन्हाळा आणि सुट्ट्यांचा काळ यामुळे ही टंचाई अधिक गडद होऊ शकते. त्यातही गंभीर आजार असणाऱ्या रुग्णांना आवश्यक असणारे सिंगल डोनर प्लेटलेटस मिळवण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागते.

### मौजमजेसाठी मोबाइल चोरणारे गजाआड-43 मोबाइल संच जप्त

पुणे (दैनिक संध्या) : मौजमजा करण्यासाठी नागरिकांकडील मोबाइल संच चोरणाऱ्या दोघांना येरवडा पोलिसांनी अटक केली. त्यांच्याकडून ४३ मोबाइल संच जप्त करण्यात आले आहेत. या प्रकरणी राजकुमार सोनू पाटील (वय १९, रा. ताडीवाला रस्ता, पुणे स्टेशनजवळ), गौरव बाळू खुडे (वय १९, रा. अप्पर इंदिरानगर, बिबवेवाडी) यांना अटक करण्यात आली. येरवडा परिसरात एका पादचाऱ्याचा मोबाइल संच हिसकावून नेण्याची घटना २९ एप्रिल रोजी रात्री घडली होती. या प्रकरणी येरवडा पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. येरवडा पोलिसांकडून तपास करण्यात येत होता. पादचाऱ्याचा मोबाइल संच हिसकावणारे चोरटे मोबाइल संच विक्रीसाठी येणार असल्याची माहिती पोलीस कर्मचारी साईनाथ म्हस्के यांना मिळाली. त्यानंतर तपास पथकाने सापळा लावून पाटील आणि खुडे यांना पकडले. चौकशीत दोघांनी पुणे रेल्वे स्थानक, तसेच निर्जन रस्त्यांवर पादचाऱ्यांकडील मोबाइल संच हिसकावून नेण्याचे गुन्हे केल्याची कबुली दिली. तपासात त्यांच्याकडून दोन लाख ६५ हजार रुपयांचे ४३ मोबाइल संच जप्त करण्यात आले. मौजमजेसाठी आरोपींनी मोबाइल संच हिसकाविण्याचे गुन्हे केल्याची कबुली दिली. पोलीस उपायुक्त चिलुमुला रजनीकांत, सहायक आयुक्त सुनील जैजापुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक अंजुम बागवान, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विजय ठाकर, सहायक निरीक्षक प्रसन्न जराड, उपनिरीक्षक किशोर बेरड, शैलेश बावळे, मुकुंद कोकणे, संदीप जायभाय, साईनाथ म्हस्के, नटराज सुतार, बालाजी सोगे यांनी ही कामगिरी केली. मोटारीची काच फोडून चोरट्यांनी नऊ लाख दहा हजार रुपयांचे सोन्याचे दागिने चोरून नेल्याची घटना कोथरूड भागात घडली. या प्रकरणी चोरट्यांविरुद्ध अलंकार पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. याबाबत एका ज्येष्ठ नागरिकाने अलंकार पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार ७५ वर्षीय ज्येष्ठ नागरिक हे कोथरूडमधील डहाणूकर कॉलनी परिसरात राहायला आहेत.




# महाराष्ट्र दिनानिमित्त eSVee Academyचा माणुसकीला सलाम

## वृद्धाश्रम आणि मतिमंद विद्यालयात सेवा, सन्मान आणि मायेचा स्पर्श

पुणे (दै. संध्या)

महाराष्ट्र दिन म्हणजे केवळ अभिमानाचा दिवस नाही, तर समाजाप्रती आपली जबाबदारी जपण्याची प्रेरणा देणारा दिवस आहे. हाच सामाजिक संदेश जपत eSVee Academy ने महाराष्ट्र दिनानिमित्त मातोश्री वृद्धाश्रम तसेच मतिमंद विद्यालयामध्ये एक अत्यंत प्रेरणादायी आणि हृदयस्पर्शी सेवा उपक्रम राबवला.




उपक्रमांतर्गत वृद्धाश्रमातील आजी–आजोबांना तसेच मतिमंद विद्यालयातील विद्यार्थ्यांना पूर्णतः मोफत हेअरकट, ग्रूमिंग आणि निगा सेवा प्रेमाने देण्यात आल्या. या सेवेमागे केवळ सौंदर्य नव्हतं, तर त्यांच्या चेहऱ्यावर हास्य आणण्याचा, आत्मविश्वास वाढवण्याचा आणि आत्मसन्मान जपण्याचा सुंदर प्रयत्न होता.

आजी–आजोबांच्या डोळ्यांत दिसलेला आनंद आणि मतिमंद विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेलं निरागस हास्य, हा संपूर्ण उपक्रमाचा सर्वात भावनिक आणि प्रेरणादायी क्षण ठरला. प्रेम, आपुलकी आणि सन्मानाची भावना अनुभवताना अनेकांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले. विशेष म्हणजे eSVee Academy गेली १० वर्षांहून अधिक काळ अशा प्रकारची निस्वार्थ सामाजिक सेवा सातत्याने करत आहे. कोणताही दिखावा किंवा अपेक्षा न ठेवता, समाजातील गरजू घटकांसाठी मायेचा हात पुढे करण्याची परंपरा संस्थेने जपली आहे.

या प्रेरणादायी कार्यामागे संस्थापक विजय वाघमारे आणि शिल्पा जेयमणी यांची संवेदनशील विचारसरणी आणि सामाजिक बांधिलकी महत्त्वाची ठरली.

"व्यवसायासोबत समाजासाठी योगदान देणं, हीच खरी यशाची ओळख" हा त्यांचा विचार आज अनेक तरुणांसाठी प्रेरणास्थान ठरत आहे. eSVee Academy ही केवळ ब्युटी आणि हेअर प्रशिक्षण देणारी संस्था नसून, माणुसकी जपणारी आणि समाजाला सकारात्मक दिशा देणारी एक सुंदर सामाजिक चळवळ बनली आहे.

सेवेचा हात, मायेचा स्पर्श आणि आत्मसन्मानाची जाणीव — हाच eSVee Academy चा खरा महाराष्ट्र दिन उत्सव ठरला.

## पुण्यात खळबळ; धायरीत सासऱ्याने केला सुनेचा खून

पुणे (दै. संध्या)

कौटुंबिक वादातून सासऱ्याने सुनेचा खून केल्याची धक्कादायक घटना शनिवारी उघडकीस आली आहे. सुनेचे डोके भिंतीवर आपटल्यानंतर दगडाने मारहाण करून तिचा खून केला. त्यानंतर सासरा घराला कुलूप लावून पसार झाल्याचे समोर आले आहे. पोलिस त्याचा शोध घेत आहेत.

स्वाती तेजस चौधरी (वय 31) असे खून झालेल्या महिलेचे नाव आहे. याप्रकरणी आरोपी सासरा भानुदास भास्कर चौधरी (वय 57) यांच्याविरुद्ध नांदेड सिटी पोलिस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना शनिवारी (दि.02) रायकर मळा धायरी परिसरात घडली आहे. याबाबत तेजस चौधरी यांनी फिर्याद दिली आहे. चौधरी कुटुंबीय मूळचे जळगाव येथील राहणारे आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, स्वाती चौधरी यांचे पती तेजस चौधरी हे शिवाजीनगर न्यायालयात क्लर्क म्हणून कार्यरत आहेत. शनिवारी सकाळी साडेनऊच्या सुमारास ते न्यायालयात गेले होते. त्यामुळे घरी सहा महिन्यांच्या बाळासह स्वाती आणि तिचे सासरे होते. स्वाती आणि त्यांचे सासरे भानुदास चौधरी यांच्यात कौटुंबिक कारणावरून वारंवार वाद होत असत. शनिवारी सकाळी साडेनऊ ते बारा वाजताच्या सुमारास त्यांच्यात पुन्हा वाद झाला.

या दरम्यान स्वाती या बाथरूममध्ये कपडे धुण्यासाठी गेल्या असताना भानुदास चौधरी तेथे गेले. त्यांनी स्वाती यांचे डोके भिंतीवर आपटले आणि कपडे धुण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या दगडाने त्यांना मारले. त्यामध्ये स्वाती यांचा मृत्यू झाला. यानंतर आरोपीने घराला कुलूप लावून पळ काढला. तेजस यांच्या बहिणीने वहिणी स्वाती हिला फोन केला होता. मात्र, तो काही उचलला नाही. त्यानंतर तिने भावाला फोन केला. ते कोर्टात गेले होते. शेवटी तिने शेजारी राहणाऱ्या एका महिलेला फोन करून घरी काय झाले ते पाहण्यास सांगितले.

## शारदाबाई पवार विद्यानिकेतनचा अभिमान, बारामतीत वर्चस्व!

पुणे (दै. संध्या)

पुणे विभागाने घेतलेल्या एच.एस.सी. बोर्ड २०२६ परीक्षेत शारदानगर येथील शारदाबाई पवार विद्यानिकेतन कनिष्ठ महाविद्यालयाने विज्ञान शाखेत १००% निकालाची परंपरा कायम ठेवली. कु. सिद्धी बाबासाहेब ढवळे हिने ९३.८३% गुणांसह प्रथम क्रमांक मिळविला. तसेच गणित विषयात १०० पैकी १०० गुण मिळवून राज्यात प्रथम येण्याचा मान मिळविला.

धनश्री कुबेर हिने ९३.१७% गुणांसह द्वितीय क्रमांक मिळविला तर कु. आकांक्षा ज्ञानेश्वर नप्ते हिने ९२% गुणांसह तृतीय क्रमांक पटकावला. याशिवाय, आदित्य धनराज बावधनकर आणि कु. उत्कर्षा गोरक्षनाथ नवले यांनी अनुक्रमे माहिती तंत्रज्ञान आणि कृषी विज्ञान व तंत्रज्ञान या विषयांत १०० पैकी १०० गुण मिळवून राज्यात प्रथम येत महाविद्यालयाचा गौरव वाढविला.


याबरोबरच पुढील विद्यार्थ्यांनीही या निकालात उत्कृष्ट गुण मिळविले- संयुक्ता उदय काकडे ८९.८३%, साईराज किरण महाडिक ८९.५०%, यशराज विशाल शिंदि-८८.८३%, राज राहूल शेरकर ८७.८३%, तन्वी कैलास होनमाने ८७.३३%, ऋतुजा सतिश पायघन व प्रांजली विनोद ढोरे- ८७%, आकांक्षा अमोल घनवट, सुरज संतोष सांगळे आणि सार्थक संजय विधाते ८६.८३%.

या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व प्राध्यापकांचे अभिनंदन संस्थेचे चेअरमन राजेंद्र पवार, विश्वस्त सुनंदाताई पवार, संस्थेचे सीईओ निलेश नलावडे, एच. आर. गार्गी दत्ता, समन्वयक प्रशांत तनपुरे, सुर्यकांत मुंढे व विभागप्रमुख योगेश झणझणे यांनी केले.

## बंधन इनोव्हेशन फंडाची दोन वर्षे पूर्ण; नाविन्याधारित गुंतवणुकीवर भर कायम

पुणे (दै. संध्या)

Bandhan Innovation Fund या गुंतवणूक योजनेने नाविन्याधारित वाढीवर लक्ष केंद्रित करत दोन वर्षांचा टप्पा पूर्ण केला आहे. देशाच्या भविष्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या आणि नाविन्यतेच्या बळावर प्रगती करणाऱ्या उद्योगांमध्ये गुंतवणूक करण्यावर या योजनेचा भर आहे.



विशिष्ट उद्दिष्टाने सुरू करण्यात आलेल्या या योजनेत संशोधन व विकासावर मोठा खर्च करणाऱ्या, उच्च कौशल्य असलेल्या मनुष्यबळाचा वापर करणाऱ्या, वैशिष्ट्यपूर्ण उत्पादने किंवा सेवा देणाऱ्या तसेच मजबूत प्रतिमा असलेल्या उद्योगांमध्ये गुंतवणूक केली जाते. पारंपरिक आर्थिक चक्रांपेक्षा नाविन्यतेच्या चक्रावर आधारित आणि वेगाने वाढणाऱ्या क्षेत्रांतील संधी शोधण्यावर भर दिला जातो.

याबाबत प्रतिक्रिया देताना योजनेचे व्यवस्थापक Pratik Poddar यांनी सांगितले की, "दीर्घकालीन स्पर्धात्मकता मिळवण्यासाठी नाविन्यता हा अत्यंत महत्त्वाचा घटक ठरत आहे. जे उद्योग सातत्याने नवे प्रयोग करतात, ते अल्पकालीन आर्थिक बदलांचा परिणाम कमी करत उत्पादनक्षमता वाढवू शकतात, बाजारातील हिस्सा वाढवू शकतात आणि नवीन बाजारपेठाही निर्माण करू शकतात."

भारतामध्ये अभियंते, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ आणि उद्योजक यांच्या माध्यमातून नवीन उत्पादने व सेवा विकसित होत असून, याच क्षेत्रांमध्ये भविष्यातील आर्थिक नेतृत्व घडत आहे. अशा उद्योगांमध्ये त्यांच्या प्रारंभीच्या टप्प्यात गुंतवणूक करणे ही गुंतवणूकदारांसाठी मोठी संधी असल्याचेही त्यांनी नमूद केले.

ही योजना अशा गुंतवणूकदारांसाठी उपयुक्त मानली जाते, जे दीर्घकालीन गुंतवणुकीस तयार असून अधिक जोखीम स्वीकारण्याची क्षमता ठेवतात. तसेच, विविधता राखण्यासाठी इतर मोठ्या उद्योगांमध्ये गुंतवणूक करणाऱ्या योजनांना ही योजना पूरक ठरू शकते.

तिसऱ्या वर्षात पदार्पण करताना, नाविन्यतेच्या आधारे शाश्वत मूल्य निर्माण करणाऱ्या उद्योगांमध्ये गुंतवणूक सुरू ठेवणे आणि देशाच्या आर्थिक बदलांशी सुसंगत राहणे हेच या योजनेचे प्रमुख उद्दिष्ट राहणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

## एमओए दिनानिमित्त आठवडाभर जनजागृती उपक्रम

पुणे (दै. संध्या)

महाराष्ट्र अस्थिरोग संघटना (एमओए) तर्फे 'एमओए दिन' निमित्त १ मे ते ७ मे २०२६ या कालावधीत राज्यभर विविध जनजागृती उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. हाडे, सांधे आणि मणक्यांच्या आरोग्याबाबत सर्वसामान्य नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमांचा मुख्य उद्देश आहे. यंदाची संकल्पना "आपले गुडघे वाचवा, आपले मणके वाचवा, आपले हाडे वाचवा" अशी ठेवण्यात आली आहे.




या उपक्रमांचा शुभारंभ पुण्यातील संचेती रुग्णालय येथे मान्यवर अस्थिरोग तज्ज्ञ आणि पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झाला. यावेळी डॉ. पराग संचेती, डॉ. एन. जे. कर्णे, डॉ. प्रशांत टोनपे, डॉ. सचिन आबणे, डॉ. मुकेश धर्मा, डॉ. मनीष कुलकर्णी, डॉ. अतुल पाटील तसेच डॉ. शैलेश हडगांवकर आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. कर्णे यांनी संघटनेच्या स्थापना दिनाचे महत्त्व अधोरेखित करत सांगितले की, २०१८ पासून १ मे हा दिवस 'एमओए दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. त्या अनुषंगाने दरवर्षी १ ते ७ मे या कालावधीत राज्यभर विविध जनजागृतीपर कार्यक्रम आयोजित केले जातात.

या उपक्रमांद्वारे हाडांचे आरोग्य, सांध्यांचे विकार, मणक्यांचे आजार, हाडांची ठिसूळता, गुडघेदुखी व पाठदुखी यांचा प्रतिबंध तसेच निरोगी जीवनशैली याबाबत जनजागृती केली जात आहे.

या आठवड्यात राज्यातील विविध ठिकाणी जनजागृती व्याख्याने, मोफत अस्थिरोग तपासणी शिबिरे, हाडांची घनता तपासणी, सार्वजनिक संवाद कार्यक्रम आणि शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. दरम्यान, संचेती रुग्णालय येथे आयोजित मोफत तपासणी शिबिरात ५०० हून अधिक नागरिकांनी सहभाग नोंदविला.

## सलग दुसऱ्या वर्षी मेटलाइफ टॉप २५ मध्ये

पुणे (दै. संध्या)

जगातील अग्रगण्य वित्तीय सेवा कंपन्यांपैकी एक असलेल्या मेटलाइफने जाहीर केले आहे की, २०२६ साठी भारतातील टॉप २५ सर्वोत्तम कार्यस्थळांमध्ये स्थानयादीत त्याचा समावेश झाला आहे. हा महत्त्वपूर्ण टप्पा मेटलाइफच्या उद्देशपूर्ण, सर्वसमावेशक कार्यस्थळ निर्माण करण्याच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे प्रतीक आहे, जिथे कर्मचारी स्वतःला महत्त्वपूर्ण, सक्षम आणि यशस्वी होण्यासाठी प्रेरित समजतात.

ही मान्यता कंपनीच्या सातत्यपूर्ण, उच्च-विश्वास कर्मचारी अनुभव देण्याच्या वचनबद्धतेला अधोरेखित करते. मजबूत पीपल प्रॅक्टिसेस आणि काळजी, सहयोग व प्रगतीवर आधारितसंस्कृतीद्वारे मेटलाइफ आपल्या कर्मचाऱ्यांसाठी विश्वासार्ह आणि प्रेरणादायी कार्यस्थळनिर्माण करत आहे.

"भारताच्या बीएफएसआय क्षेत्रातील बेस्ट वर्कप्लेस २०२६ मध्ये आमचा समावेश झाल्याचाआम्हाला अभिमान आहे," असे मेटलाइफ ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटरचे व्यवस्थापकीय संचालक अशिष के. श्रीवास्तव यांनी सांगितले. "ही कामगिरी सर्वसमावेशक आणि सहायक कार्यस्थळ निर्माण करण्याच्या आमच्या अखंड वचनबद्धतेचे प्रतीक आहे, जिथे आमचे कर्मचारी प्रगती करू शकतात. मेटलाइफमध्ये आम्ही आमच्याटीम्सना सक्षम बनवणारी आणि अर्थपूर्ण परिणाम साधणारी संस्कृती जोपासण्यावर लक्षकेंद्रित करतो."

ग्रेट प्लेस टू वर्क ® संस्था गेल्या तीन दशकांहून अधिक काळ विविध संस्थांमधीलकर्मचारी अनुभव आणि पीपल प्रॅक्टिसेस यांचा अभ्यास करत आहे. कर्मचारी अभिप्रायआणि संस्कृतीचे ऑडिट यांचा समावेश असलेल्या कठोर पद्धतीद्वारे ती संस्थांना उच्च-विश्वास कार्यस्थळ निर्माण व टिकवून ठेवण्यास मदत करते. दरवर्षी १५० हून अधिकदेशांतील लाखो कर्मचारी या मूल्यमापनात सहभागी होतात, ज्यामुळे संस्थांना त्यांच्यासंस्कृतीचे बेंचमार्किंग करता येते आणि पीपल प्रॅक्टिसेस अधिक मजबूत करता येतात.

ही सलग दुसरी वेळ आहे की मेटलाइफला या प्रतिष्ठित यादीत स्थान मिळाले आहे. याशिवाय, मेटलाइफला जगभरातील 33 बाजारपेठांमध्ये ग्रेट प्लेस टू वर्क प्रमाणपत्रमिळाले असून, फॉर्च्युन वर्ल्ड्स २५ बेस्ट वर्कप्लेसTM 2025 यादीत दहाव्या क्रमांकावरस्थान मिळाले आहे. या कामगिरी कंपनीच्या कर्मचारी, ग्राहक आणि समुदाय यांच्याप्रतीअसलेल्या अखंड वचनबद्धतेचे प्रतीक आहेत.

# बुद्ध पौर्णिमेनिमित्त 'धम्म पहाट'ला पुणेकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

पुणे (दै. संध्या)

तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या जयंतीनिमित्त 'विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समिती, पुणे' यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'धम्म पहाट' कार्यक्रमाला पुणेकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शांतता, समता आणि बंधुभावाचा संदेश देणाऱ्या या सांस्कृतिक कार्यक्रमातून बुद्धविचारांचा जागर पुन्हा एकदा अनुभवायला मिळाला.

यंदा या कार्यक्रमाचे २० वे वर्ष असून, या विशेष प्रसंगी पुण्याच्या महापौर मंजूषा नागपुरे, उपमहापौर तथा कार्यक्रमाचे आयोजक परशुराम वाडेकर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, बार्टीच्या सुचिता शिंदे, माजी नगरसेविका लता राजगुरू, नगरसेवक निलेश आल्हाट, रिपब्लिकन पक्षाचे शहराध्यक्ष संजय सोनवणे, रमाई स्मारकाचे प्रमुख विठ्ठल गायकवाड, बबन जोगदंड, माजी उपमहापौर सुनीता वाडेकर, समितीचे सचिव दीपक म्हस्के, मिलिंद अहिरे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात चेतन चोपडे यांच्या नेतृत्वाखालील कलापथकाने 'भीमा तुझ्या पाऊल खुणा' या भीमगीतांच्या सादरीकरणातून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. विकास साळवे, स्नेहल प्रधान यांच्यासह अन्य कलाकारांनी प्रभावी साथ दिली. 'प्रथम नमो गौतमा', 'तुज प्रथम हे नमन गौतमा', 'अनुसरा शिकवण बुद्धाची', 'नमो बुद्धाय म्हणे', 'प्रबुद्ध हो मानावा', 'पिंपळाच्या पानावर पाहिले चित्र गौतमाचे', 'करू भीमाचे चिंतन इथे', 'बुद्ध-फुले-आंबेडकर सांगू आम्ही', 'भीम भगवान माझ्या झोपडीत शान आहे' यांसारख्या गीतांनी वातावरण भारावून गेले.



तसेच, राजर्षी शाहू महाराजांवरील 'माझा लोकराजा शाहू' या रॅपसह विविध गीतांनी कार्यक्रमाला वेगळी उंची दिली. उपमहापौर परशुराम वाडेकर यांच्या विनंतीवरून सादर करण्यात आलेले शाहीर वामनदादा कर्डक यांचे 'पाणी वाढ गं माय', 'लई नाय मागत', 'भर माझं इवलंसं गाडगं' या गीतांनी उपस्थितांच्या मनाला स्पर्श केला.

यावेळी बोलताना उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी सांगितले की, गेली वीस वर्षे 'धम्म पहाट' या कार्यक्रमाचे सातत्याने आयोजन करण्यात येत आहे. महापौर मंजूषा नागपुरे यांच्या सहकार्याने महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा नवीन पुतळा, रमाईंचा पुतळा आणि संविधान उद्यान यांसारखे प्रेरणादायी प्रकल्प राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

सध्याच्या जागतिक परिस्थितीत अनेक ठिकाणी युद्धजन्य वातावरण असताना भारतात बुद्धविचारांवर आधारित संविधानामुळे शांतता टिकून आहे. जगाला शांततेचा मार्ग दाखविण्याचे सामर्थ्य बुद्ध विचारांमध्ये असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले. कार्यक्रमाची सुरुवात बुद्ध वंदनेने झाली, तर समारोप धम्म पालन गाथेने करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दीपक म्हस्के आणि महेश अचिंतवार यांनी केले.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### जेजुरी ग्रामस्थांच्या वतीने नसरापूर येथील घटनेचा निषेध

जेजुरी (दैनिक संध्या) : पुणे जिल्ह्यातील नसरापूर येथे अमानुष अत्याचाराला बळी पडलेल्या चिमुकलीला भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.तसेच या अत्याचाराच्या घटनेचा जाहीर निषेध करण्यात आला. जेजुरी ग्रामस्थ विविध संघटनांच्या वतीने जेजुरी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात निषेध सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेत नसरापूर येथील अत्याचार व खून झालेल्या चीमुकलीला श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी बोलताना जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते प्रकाश खाडे यांनी ही घटना अत्यंत दुर्दैवी असून गगुन्हेगारी पार्श्वभूमी असणाऱ्या क्रूर आरोपीला मृत्युदंडाची शिक्षा झाली पाहिजे अशी मागणी केली.यावेळी जेजुरी शहर भाजपचे अध्यक्ष सचिन पेशवे,भाजपाचे ज्येष्ठ कार्यकर्ते प्रसाद अत्रे यांनी या घटनेचा आपल्या भाषणात निषेध केला. जाहीर सभेनंतर जेजुरी पोलीस स्टेशन मध्ये जावून क्रूर आरोपीला लवकरात लवकर मृत्युदंडाची शिक्षा व्हावी या मागणीचे पत्र देण्यात आले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते प्रकाश खाडे,दत्तप्रसाद खाडे, जेजुरी खंडोबा देवाचे मानकरी राजाभाऊ पेशवे,प्रसाद अत्रे, जेजुरी शहर भाजपाचे अध्यक्ष सचिन पेशवे, जेजुरी आरोग्य सेवा संघाचे डॉ नितीन केंजळे, जेजुरी देवसंस्थान चे माजी विश्वस्त नितीन राऊत,राजेंद्र देशपांडे, महेंद्र लोणकर, नितींन पुरोहित, धनजंय केळकर, महेश निकुडे , शेखर सेवेकरी, अक्षय डीनग्रे, पराग घोलप, अशोक रणदिवे, राजेंद्र बेलसरे, सचिन लोणकर, विजयकुमार हरिश्चंद्र,अमित खाडे, चैत्यन खाडे व मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

### फोर्स मोटर्सची विक्रमी झेप; आर्थिक वर्ष 2025-26 मध्ये सर्वोच्च महसूल व नफा

पुणे (दैनिक संध्या) : Force Motors या अग्रगण्य वाहन निर्मिती कंपनीने आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये आतापर्यंतचा सर्वोच्च महसूल आणि नफ्याची नोंद केली आहे. ३१ मार्च २०२६ रोजी संपलेल्या तिमाही आणि संपूर्ण वर्षाचे आर्थिक निकाल जाहीर करताना कंपनीने सातत्यपूर्ण कामगिरी, खर्च नियंत्रण आणि सर्व उत्पादन विभागांतील वाढ यामुळे ही ऐतिहासिक कामगिरी साध्य झाल्याचे स्पष्ट केले. कंपनीने वर्षभरातील प्रत्येक तिमाहीत स्थिर प्रगती नोंदवली असून, व्यवसायातील शिस्तबद्धता आणि नियोजनबद्ध विस्तार यामुळे एकूण आर्थिक स्थितीत भक्कम सुधारणा झाली आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ हे कंपनीच्या प्रवासातील महत्त्वपूर्ण टप्पा ठरले असल्याचेही नमूद करण्यात आले. देशांतर्गत बाजारपेठेत कंपनीने उल्लेखनीय कामगिरी करत मागील वर्षाच्या तुलनेत एकूण घाऊक विक्रीत सुमारे २० टक्के वाढ नोंदवली. व्हॅन विभागात कंपनीने आपले वर्चस्व कायम राखत सुमारे ७० टक्क्यांहून अधिक हिस्सा टिकवून ठेवला आहे. प्रीमियम प्रवासी वाहतूक विभागात 'अर्बेनिया' या मॉडेलने शंभर टक्क्यांपेक्षा जास्त वाढ नोंदवून महत्त्वाची झेप घेतली आहे. ग्रामीण आणि अर्धशहरी भागात कंपनीने आपला विस्तार अधिक बळकट केला असून 'ट्रॅक्स' या वाहनाला मिळालेल्या प्रतिसादामुळे या विभागात ७० टक्क्यांहून अधिक वाढ झाली आहे. तसेच संस्थात्मक व संरक्षण क्षेत्रातही कंपनीने आपली उपस्थिती मजबूत करत सशस्त्र दलांसाठी विशेष वाहनांच्या महत्त्वपूर्ण मागण्यांची पूर्तता केली आहे. कंपनीने कर्जमुक्त स्थिती कायम राखली असून, आर्थिक शिस्त आणि भांडवलाचे नियोजनबद्ध व्यवस्थापन यामुळे ही कामगिरी शक्य झाल्याचे सांगण्यात आले. याबाबत प्रतिक्रिया देताना कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक Prasan Firodia म्हणाले, "स्थापनेपासूनच आम्ही नव्या विभागांची निर्मिती करण्यावर भर दिला आहे. 'अर्बेनिया'मुळे प्रीमियम प्रवासी वाहतूक क्षेत्रात आम्ही आघाडी घेतली आहे, तर 'ट्रॅव्हलर' आणि 'ट्रॅक्स'सारखी वाहने बाजारपेठेतील विस्ताराला गती देत आहेत. तसेच संरक्षण आणि संस्थात्मक क्षेत्रातील सहकार्यामुळे आमची अभियांत्रिकी क्षमता अधोरेखित झाली आहे." ते पुढे म्हणाले की, आर्थिक वर्ष २०२५-२६ हे कंपनीसाठी अभूतपूर्व ठरले असून सातत्यपूर्ण अंमलबजावणीमुळे विक्रमी आर्थिक कामगिरी साध्य झाली आहे. आगामी काळात ग्राहकांच्या गरजांनुसार उत्पादने, तंत्रज्ञान आणि नवकल्पना अधिक मजबूत करण्यावर कंपनीचा भर राहणार आहे.



### फराह खानसोबत क्लूक इंडियाच्या नव्या कॅम्पेनची सुरुवात

मुंबई (दैनिक संध्या) : उन्हाळ्याच्या काळासाठी क्लूक इंडियाने सिनेक्षेत्राशी संबंधित फराह खान हिच्याशी हातमिळवणी करत नव्या कॅम्पेनची सुरुवात केली आहे. फराहने घेतलेला शहरांचा घेतलेला अनुभव, तिचा प्रवास आणि पर्यटनाबाबतचे विचार यावर आधारित अपेक्षित आणि अनपेक्षित अशा पर्यटनाचा आनंद नागरिकांना घेता येणार आहे. क्लूकच्या 'वर्ल्ड ऑफ जॉय' मध्ये सामील होण्यासाठी फराह खान सिंगापूरला जाणार आहे. याआधी तिने या शहराला भेट दिली असली तरी आताचा तिचा अनुभव वेगळा असणार आहे. आपला खाजगी शेफ दिलीप याच्यासोबत ती यावेळी सिंगापूरची सफर करणार आहे. बहुतांश वेळा पर्यटक हे त्यांच्या नेहेमीच्या मार्गाने प्रवासाला जातात. लोकांनी केलेल्या शिफारशीनुसार ठिकाणे बघतात अथवा खाण्या—पिण्याचा आनंद घेतात. मात्र मोहिमेअंतर्गत क्लूक इंडिया पर्यटकांना वेगळ्या दृष्टीकोनातून प्रवासाचा आनंद चोखाळायची संधी देणार आहे. क्लूक इंडियाच्या डिजिटल पध्दतीने राबविलेल्या जाणाऱ्या मोहिमेची सुरुवात इन्स्टाग्रामच्या माध्यमातून होत आहे. फराह खानच्या प्रवास कथा, तिच्या तीन प्रवासाच्या संक्षिप्त मालिका यात पहावयास मिळतील. प्रसिध्द पर्यटन स्थळे, हिडन जेम्स, शेवटच्या क्षणी आखली जाणारी योजना किंवा एकदम नवा प्रवास यासाठी हरतऱ्हेचे मार्गदर्शन क्लूक इंडिया करते, असे कंपनीचे भारत आणि मध्यपूर्व देशांचे मार्केटिंग विभागांचे प्रमुख शिवम त्यागी यांनी सांगितले.

### स्व. सुरेशभाऊ गोरे महाविद्यालयाचा बारावीचा 85.71 टक्के निकाल

चाकण (दैनिक संध्या) : स्व. गुलाबराव गोरे शिक्षण संस्थेच्या येथील स्व. आमदार सुरेशभाऊ गोरे ज्युनियर कॉलेजचा बारावी परीक्षेचा शेकडा ८५.७१ टक्के निकाल लागला. उत्तीर्ण विद्यार्थी व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष विकास गोरे, प्राचार्या प्रमिला गोरे, चाकणच्या नगराध्यक्षा मनिषा गोरे, उपनगराध्यक्षा सुवर्णा राक्षे, गटनेते नितीन गोरे, प्राचार्य सचिन आभाळे, प्रिंसिपल माधुरी गोरे आदींनी कौतुक केले. विभागा प्रमाणे निकाल पुढील प्रमाणे - विज्ञान विभाग - ८५.७१ टक्के, प्रथम सिद्धी गोरक्षनाथ कदम, द्वितीय कुणाल भास्कर भिसे, तृतीय क्रमांक पुनम सुनिल नागरगोजे यांचा आला आहेत. वाणिज्य विभाग - ७३.९१ टक्के, प्रथम ऐश्वर्या हनुमंत मोहिते, द्वितीय अंकिता गणेश क्षीरसागर, तृतीय क्रमांक आनंद नीलकंठ गायकवाड यांचा आला आहे. कला विभागात चैताली गजभिये यांचा प्रथम क्रमांक आला आहे.

# पुण्यातील नसरापूर प्रकरणात वेगवान न्यायासाठी विशेष प्रयत्न

## कुटुंबाचे संरक्षण व पुनर्वसन करणे ही सरकारची बांधिलकी : उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे

पुणे (दै. संध्या) :

- "आईच्या हंबरड्याने मन हेलावलं... चिमुकलीच्या न्यायासाठी लढा थांबणार नाही"
- महिलांविरोधातील गुन्ह्यांसाठी फास्टट्रॅक न्यायालये वाढवण्याची गरज अधोरेखित; मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांकडे पाठपुरावा करणार



पुणे जिल्ह्यातील नसरापूर येथे चिमुकलीवर अत्याचार करून तिची निर्घृण हत्या झाल्याच्या घटनेने राज्यभर संताप व्यक्त होत असताना, शिवसेना नेत्या व विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी पुण्यातील पीडित मुलीच्या घरी जाऊन कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेतली.

या भेटीदरम्यान कुटुंबीयांचे दुःख पाहून डॉ. गोऱ्हे भावूक झाल्या. "आईच्या हंबरड्याने मन हेलावलं. या चिमुकलीला न्याय मिळवून देण्यासाठी लढा शेवटपर्यंत सुरू राहील," असे त्यांनी सांगितले. कुटुंब प्रचंड मानसिक धक्यात असल्याने कोणतेही फोटो किंवा व्हिडिओ न करता शांततेत संवाद साधल्याचेही त्यांनी नमूद केले.

कुटुंबीय व स्थानिक नागरिकांनी आरोपीला तातडीने कठोर शिक्षा देण्याची मागणी केली असून, यासाठी वरिष्ठ सरकारी वकील उज्ज्वल निकम यांच्याकडे पाठपुरावा सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली.

बालहक्क आयोगाने या प्रकरणात अधिक जबाबदारीने काम करण्याची गरज असल्याचे सांगताना, योग्य सही व पोलीस स्टेशनच्या गुन्हा क्रमांकासह प्रकरणाचा पाठपुरावा करण्याचे निर्देश त्यांनी दिले. तसेच पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी विशेष तपास समिती स्थापन केल्याचे पत्र प्राप्त झाले असून त्याची प्रतही घेतल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कुटुंबाशी संवाद साधून त्यांना धीर दिला असून, सरकार संपूर्णपणे कुटुंबाच्या पाठीशी उभे असल्याचा संदेश दिला आहे. "न्याय मिळवून देणे, तसेच कुटुंबाचे संरक्षण व पुनर्वसन करणे ही सरकारची बांधिलकी आहे," असे डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले.

सोशल मीडियावर पीडित मुलीचे फोटो किंवा ओळख उघड करणारे संदेश प्रसारित होणे हे गंभीर व बेकायदेशीर असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. "पॉक्सो कायद्यानुसार पीडितेची ओळख उघड करणे गुन्हा आहे. नागरिकांनी असे संदेश तात्काळ डिलीट करावेत," असे आवाहन त्यांनी केले. उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयानेही याबाबत स्पष्ट निर्देश दिले असल्याचे त्यांनी सांगितले.

या घटनेचा जात-धर्माच्या आधारावर गैरफायदा घेण्याचा प्रयत्न करणाऱ्यांवरही त्यांनी तीव्र शब्दांत टीका केली. "न्याय हा धर्म किंवा जात पाहून होत नाही. सर्व समाज एकत्र येऊन पीडित कुटुंबाच्या पाठीशी उभा आहे, हेच खरे चित्र आहे," असे त्यांनी नमूद केले.

काही घटक पीडित कुटुंबाला आंदोलनात सहभागी होण्यास प्रवृत्त करत असल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली. "दुःखात असलेल्या कुटुंबाला आंदोलनासाठी भाग पाडणे हे अमानुष आहे. आंदोलन करायचे असल्यास इतरांनी करावे, पण कुटुंबाला त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी," असे त्यांनी स्पष्ट केले.

माध्यमांमधून व सोशल मीडियातून काही चुकीची माहिती पसरवली जात असल्याचेही त्यांनी निदर्शनास आणले. पीडित मुलीच्या वडिलांशी पोलिसांनी गैरवर्तन केल्याचा आरोप चुकीचा असल्याचे कुटुंबीयांनी स्वतः सांगितल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कोपरडी प्रकरणाचा संदर्भ देत त्यांनी सांगितले की, त्या प्रकरणात सत्र न्यायालयाने आरोपींना फाशीची शिक्षा सुनावली असून पुढील प्रक्रिया न्यायालयात सुरू आहे. "कायद्याच्या चौकटीत राहून कठोर शिक्षा मिळवणे आवश्यक आहे," असे त्यांनी म्हटले.

राज्यात महिलांविरोधातील गुन्ह्यांच्या जलद सुनावणीसाठी फास्टट्रॅक न्यायालयांची संख्या वाढवण्याची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. अपेक्षित १३८ न्यायालयांपैकी केवळ सुमारे ४० कार्यरत असल्याचे सांगून उर्वरित न्यायालये तातडीने सुरू करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पाठपुरावा करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच सराईत गुन्हेगारांची स्वतंत्र यादी तयार करून त्यांच्यावर विशेष लक्ष ठेवण्याबाबतही न्याय विभागाशी चर्चा केल्याचे त्यांनी सांगितले.

नसरापूर प्रकरणात न्याय मिळेपर्यंत सातत्याने पाठपुरावा करण्यात येईल, तसेच येणाऱ्या अधिवेशनातही हा मुद्दा ठामपणे मांडण्यात येणार असल्याचे डॉ. नीलम गोऱ्हे यांनी शेवटी स्पष्ट केले. यावेळी, शिवसेना जिल्हाध्यक्ष रमेश कोंडे, युवासेना प्रदेश सचिव किरण साळी, पुणे महिला आघाडी संपर्क प्रमुख पूजा रावेतकर, शिवसेना अध्यात्मिक सेना प्रदेशाध्यक्ष अक्षयमहाराज भोसले, आनंद गोयल, निलेश गिरमे, हिरामण धनकवडे, निलेश घारे, कांताताई पांढरे, गायत्री भागवत, मीनल धनवटे, तेजश्री डिमले, स्त्री आधार केंद्राच्या अनिता शिंदे, आश्लेषा खंडागळे, राखी शिंगवी, मीना बनसोडे, मीरा तुपेरे, मंगल सोनटक्के उपस्थित होते.

## शंकरराव बुट्टे पाटील कनिष्ठ महाविद्यालयाचा १२वीचा निकाल ९५.४१%

जुन्नर (दै. संध्या) :

जुन्नर एज्युकेशन सोसायटीच्या शंकरराव बुट्टे पाटील कनिष्ठ महाविद्यालयाने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील इयत्ता १२वी बोर्ड परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले असून एकूण निकाल ९५.४१ टक्के लागला आहे. विज्ञान शाखेने ९९.१९ टक्के निकालासह आघाडी घेतली असून कला शाखेचा निकाल ९४.५९ टक्के तर वाणिज्य शाखेचा निकाल ८९.०६ टक्के लागल्याची माहिती प्राचार्य प्रा. गणेश आहेर यांनी दिली.

विज्ञान शाखेत कु. आयुष काळे (८९.५०%) प्रथम, कु. वैभव घोडे (७६.००%) द्वितीय व कु. मुस्कान पठाण (७४.५०%) तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले.

कला शाखेत कु. गणेश साळुंखे (८७.६७%) प्रथम, कु. समीक्षा मडके (७९.३३%) द्वितीय व कु. सलोनी विरणक (७३.००%) तृतीय क्रमांकावर राहिले.

वाणिज्य शाखेत कु. चैत्राली भालेराव (८२.८३%) प्रथम, कु. जीवन क्षीरसागर (८०.८३%) द्वितीय व कु. रिया पाद्रे (७६.३३%) तृतीय क्रमांकाने यश मिळवले.

या यशस्वी विद्यार्थ्यांचे, त्यांच्या पालकांचे तसेच मुख्याध्यापक, विभाग प्रमुख, मार्गदर्शक शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे जुन्नर एज्युकेशन सोसायटीच्या पदाधिकारी व कार्यकारी मंडळातर्फे अभिनंदन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छाही देण्यात आल्या.

## कामगारांच्या हक्कांसाठी जागतिक कामगार नेते एकत्र लढू : महेंद्रशेठ घरत

### *आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांचे नेपाळमध्ये कामगारांना मार्गदर्शन*

उरण (दै. संध्या) :




भारतीय कामगारांनी शेकडो वर्षे लढून मिळविलेले हक्क आणि कायदे बीजेपीच्या केंद्र सरकारने पायदळी तुडविले आहेत. २०१४ पासून आम्ही हे भोगत आहोत. त्यामुळे कामगार विरोधी धोरणे राबविणाऱ्या केंद्र सरकारचा आम्ही धिक्कार करीत आहोत. मी गेली ३८ वर्षे कामगारांसाठी लढतोय. दरम्यान, अनेक गुन्हे नावावर दाखल झाले आहेत; परंतु कामगारांच्या न्याय हक्कांसाठी मागे हटलो नाही. सध्या साडेतीन कोटी कामगारांचे नेतृत्व करताना आमची आयटीयुसी संघटना ताकदीने भक्कमपणे उभी आहे. त्यामुळे आम्ही सर्व जागतिक कामगार नेते कामगारांच्या न्याय हक्कांसाठी सदैव लढत राहू. नेपाळ सरकारने कामगारविरोधी भूमिका घेतल्यास आम्ही सारे रस्त्यावर उतरू आणि सरकारला 'सळो की पळो' करू," असे आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि कॉंग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ महेंद्रशेठ घरत कामगारांना मार्गदर्शन करताना नेपाळमध्ये म्हणाले.

महाराष्ट्र दिन आणि जागतिक कामगार दिनानिमित्ताने नेपाळ ट्रेड युनियन कॉंग्रेसतर्फे दुसऱ्या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन शुक्रवारी (ता.१) करण्यात आले होते. त्यावेळी महेंद्रशेठ घरत प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

या परिषदेसाठी आयटीएफ लंडनचे जनरल सेक्रेटरी स्टीफन कॉटन, आशिया पॅसिफिक रिजनल सेक्रेटरी अब्दुल गनी सारंग, नेपाल कॉंग्रेस अध्यक्ष गगन थापा, कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते शेखरजी कोईराला, नेपाळ ट्रेड युनियनचे अध्यक्ष योगेंद्र कुमार, नेपाळ ट्रेड युनियन तथा आयटीएफचे एक्झिक्युटिव्ह बोर्ड मेंबर अजयकुमार राय इत्यादी यावेळी उपस्थित होते. नेपाळ ट्रेड युनियन कॉंग्रेसतर्फे दुसऱ्या राष्ट्रीय कामगार परिषदेचे उत्तम आयोजन केल्याने महेंद्रशेठ घरत यांनी त्यांचे अभिनंदन केले.

## देवेंद्र कदम यांच्यामध्ये कामगारांसाठी काम करण्याची मोठी क्षमता

### माजी खासदार गजानन कीर्तिकर

मुंबई (दै. संध्या) :



स्थानीय लोकाधिकार सेना महासंघ उपाध्यक्ष आणि नेवल डॉकयार्ड चे कर्मचारी देवेंद्र कदम यांच्यात कामगाराप्रति काम करण्याची क्षमता फार मोठे आहे असे जाहीर प्रतिपादन माजी खासदार, स्थानीय

लोकाधिकार सेना महासंघाचे अध्यक्ष गजानन कीर्तिकर यांनी कदम यांच्या सेवानिवृत्ती सोहळ्याचे आयोजन नुकतेच सीएसटी येथील तेलारखान सभागृह नौसेना गोदीवाडा येथे केले होते. या सोहळ्यात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. ते पुढे म्हणाले,देवा कदम यांना कामगारांप्रती असलेल्या एखाद्या मोहिमेवर पाठवले तर त्यांनी ती मोहीम फत्ते केली म्हणूनच समजा. यात तिळमात्र शंका नसायची. परंतु आज देवा कदम शासनाने ठरवलेल्या वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले तरी ते आता दुसऱ्या इनिंगसाठी तयार झाले आहेत. त्यामुळे त्यांनी आता झोकून कामगारांसाठी काम करायला तयार राहिले पाहिजे. आज कामगारांवर काळया कायद्याचे फार मोठे संकट आहे. फिक्स टाईम पद्धत आणि कंत्राटीकरण यामुळे कामगारांचे मोठ्या प्रमाणात पिळवणूक होते. त्यामुळे आपल्याला फार मोठा लढा येणाऱ्या काळात उभा करायचा आहे. त्यासाठी आपल्या सगळ्यांना एकत्र येऊन लढले पाहिजे आणि कामगारांचा हक्क परत मिळवला पाहिजे. आज महाराष्ट्र दिन कामगार दिन असून मी सर्व कामगार बांधवांना महाराष्ट्र दिनाच्या आणि कामगार दिनाच्या हार्दिक शुभेच्छा देतो. खासदार गजानन कीर्तीकरांमुळेच आम्ही लढवय्ये झालो. कामगार क्षेत्रात काम करत असताना व्यवस्थापना बरोबर तडजोड कशी करावी कधी पुढे जावे आणि कधी मागे यावे याबाबत वेळोवेळी लढवय्या भूमिका कशी घ्यावी हे सर्व आम्ही गजानन कीर्तीकरांमुळेच शिकलो आणि लढवय्ये झालो. प्रत्येक कामगाराची विचारपूस करून त्याच्या सर्व समस्या जाणून घेऊन त्या सोडवण्याचे काम गजाभाऊ नेहमीच करत असतात. असा कोणताही दिवस नाही की भाऊ काम करताना आम्ही पाहिले नाही. भाऊंचे वय 84 असून देखील ते या वयात अगदी हिरीरीने काम करतात आणि कामगारांचे प्रश्न सोडवतात हे फार वाखाणण्याजोगे आहे. गजा भाऊंना आई भवानी उदंड आयुष्य देवो अशी मी ईश्वरचरणी प्रार्थना करतो असे जाहीर प्रतिपादन नेवल डॉकयार्ड सेवेतून निवृत्ती झाल्यावर देवेंद्र कदम यांनी केले.

## जागरूकता आणि कृती यांमधील दरी सांधणे : उत्पादन साक्षरतेचे 'मालकीभाव'मध्ये रूपांतर

पुणे (दै. संध्या) :

आपण अशा युगात जगत आहोत जिथे सर्वसामान्य भारतीय व्यावसायिक हा आर्थिक संज्ञांचा चालता-फिरता ज्ञानकोश आहे. तरीही आपली निवृत्तीची तयारी कमीच आहे ही आश्चर्याची बाब आहे. आपण एक असा देश आहोत जो एक सिद्धांत म्हणून निवृत्ती नियोजनाची गरज ओळखतो, पण व्यवहारात त्याला एक 'तातडीची नसलेली चैनीची गोष्ट' मानतो. हीच आहे 'जागरूकता-कृती यांच्यातील दरी' आणि ती भरून काढणे हे आता केवळ एक आर्थिक ध्येय राहिलेले नाही, तर ते वैयक्तिक आत्मसन्मानासाठी एक गरज बनले आहे. इंडिया रिटायरमेंट इंडेक्स स्टडी (आयरिस) ५.० च्या आकडेवारीतून एक सातत्यपूर्ण अवलंबित्व पूर्वग्रह दिसून येतो. त्यात भारतीयांचा एक मोठा वर्ग अजूनही आपल्या मुलांनाच आपले अंतिम सुरक्षा कवच मानतो. अनुराग गुप्ता, संचालक आणि मुख्य व्यवसाय अधिकारी, पार्टनरशिप चॅनेल, ॲक्सिस मॅक्स लाईफ इन्शुरन्स लि. म्हणाले की,



भारतातील आरोग्यसेवेचा खर्च सर्वसाधारण महागाईच्या दरापेक्षा जवळपास दुप्पट वेगाने वाढत असल्याने तुमच्या कुटुंबावर आर्थिक भार बनण्यापासून वाचण्यासाठी तुमची आर्थिक मालकी हीच तुमची एकमेव ढाल आहे. टियर २ आणि ३ भौगोलिक प्रदेशांमध्ये संयुक्त कुटुंब पद्धतींपासून दूर जाण्याच्या बदलामुळे "आत्मनिर्भरता" हा आता पर्याय राहिलेला नाही, तर ती एक भौगोलिक-निरपेक्ष गरज बनली आहे.

# मोक्का गुन्ह्यातील ६ वर्षांपासून फरार आरोपी अखेर जेरबंद

### पुणे ग्रामीण एटीएसची धडाकेबाज कारवाई

उरुळी कांचन (दै. संध्या) :



पुणे ग्रामीण दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) कारवाई करत मोक्का गुन्ह्यातील व येरवडा कारागृहातून पळून गेलेला तब्बल सहा वर्षांपासून फरार असलेला सराईत गुन्हेगार अजिंक्य उत्तम कांबळे (वय ३१, रा.सहकारनगर, टिळेकर वाडी , ता. हवेली, जि. पुणे) याला अखेर जेरबंद केले आहे. ही कारवाई शनिवार, दि. २ मे रोजी उरुळी कांचन परिसरात करण्यात आली.

मिळालेल्या माहितीनुसार, दि. २३ डिसेंबर २०१९ रोजी आरोपी अजिंक्य कांबळे व त्याच्या साथीदारांनी उरुळी कांचन येथील प्लॉटिंग व्यावसायिक विशाल खेडेकर यांचे अपहरण करून त्यांच्याकडून २० लाख रुपयांची खंडणी उकळण्याचा प्रयत्न केला होता. यावेळी त्यांना कोयत्याचा धाक दाखवत मारहाण करण्यात आली तसेच खंडणी न दिल्यास जीवितहानीची धमकी देण्यात आली होती. या प्रकरणी लोणीकाळभोर पोलीस ठाण्यात खंडणीसह महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मोक्का) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या गुन्ह्यानंतर पोलिसांनी अजिंक्य कांबळेसह त्याच्या साथीदारांना अटक करून येरवडा कारागृहात पाठवले होते. मात्र, जून २०२० मध्ये कांबळे व इतर पाच आरोपींनी कारागृहातील खिडकीचे गज काढून रात्रीच्या वेळी पलायन केले होते. या घटनेनंतर पळून गेलेल्या आरोपींपैकी पाच जणांना अटक करण्यात पोलिसांना यश आले, परंतु अजिंक्य कांबळे हा सतत पोलिसांना चकवा देत फरार राहिला. दरम्यान, आरोपी कांबळे हा अत्यंत सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर खून, खंडणी, गंभीर दुखापत, मोक्का, आर्म ॲक्ट आणि चोरी असे एकूण आठ गंभीर गुन्हे विविध पोलीस ठाण्यांत दाखल आहेत. त्याच्या भीतीमुळे व्यावसायिक विशाल खेडेकर यांना गेल्या सहा वर्षांपासून पोलीस संरक्षण देण्यात आले होते.

फरार असताना कांबळे हा परराज्यात वेषांतर करून, नाव बदलून राहत होता. तसेच अवैध गावठी अग्नीशस्त्र विक्रेत्यांशी त्याचे संबंध असल्याची माहिती एटीएस पथकाला मिळाली होती. सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक महेश गायकवाड व पो हवा निलेश कदम यांनी मिळवलेल्या गुप्त माहितीनुसार पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल यांनी विशेष पथकाची नियुक्ती केली होती. पथकाने तांत्रिक व मानवी माहितीच्या आधारे आरोपीवर पाळत ठेवून उरुळी कांचन-सोलापूर रोड परिसरातून वेषांतर केलेल्या अवस्थेत त्याला शिताफीने अटक केली.

आरोपीला फरार राहण्यासाठी कोणी मदत केली, त्याचे इतर कोणाशी संबंध आहेत का, याचा सध्या सखोल तपास सुरू आहे.

ही उल्लेखनीय कारवाई पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल व अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार यांच्या मार्गदर्शनाखाली एटीएस पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रकाश पवार, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक महेश गायकवाड, पोलीस हवालदार महेंद्र गायकवाड, रुपेश साळुंखे, निलेश कदम, सुनिल कोळी, तसेच पोलीस कॉन्स्टेबल मोसीन शेख व ओंकार शिंदे यांनी पार पाडली.

# देशाच्या विकासामध्ये श्रमिकांचा सिंहाचा वाटा : यशवंत भोसले

**पिंपरी (दै. संध्या)**



१ मे, कामगार दिन आणि महाराष्ट्र दिनाच्या औचित्याने संत तुकाराम नगर, पिंपरी, पुणे येथे राष्ट्रीय श्रमिक आघाडीच्या वतीने भव्य कामगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. श्रमिकांचे कष्ट, त्याग आणि संघर्ष यामुळेच भारत देशाचा विकास झाला असून त्यांचे योगदान कधीही विसरता येणार नाही, असे गौरवोद्गार कामगार नेते व संघटनेचे संस्थापक अध्यक्ष यशवंत भोसले यांनी काढले. राष्ट्रीय श्रमिक आघाडी, महाराष्ट्र राज्य प्रणित भाजपाच्या वतीने तसेच संत तुकाराम नगर सहकारी गृहरचना संस्था मर्यादितचे अध्यक्ष कामगार नेते यशवंत भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली कामगार व महाराष्ट्र दिना निमित्त हा मेळावा आयोजित करण्यात आला होता, या कार्यक्रमाने उपस्थितांच्या मनात श्रमिकांविषयी कृतज्ञतेची भावना निर्माण केली. कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्र दिन आणि कामगार दिनाच्या निमित्ताने झेंडावंदन करून करण्यात आली. संपूर्ण परिसर देशभक्ती आणि श्रमिकांविषयी आदराच्या भावनेने भारावून गेला होता. यावेळी मनोगत व्यक्त करताना यशवंत भोसले यांनी अत्यंत भावनिक शब्दांत श्रमिकांच्या योगदानाचे महत्त्व अधोरेखित केले. "महाराष्ट्राचा इतिहास जेव्हा लिहिला जाईल, तेव्हा सर्वात मोठे बलिदान हे श्रमिकांचेच दिसून येईल," असे ते म्हणाले. ते पुढे म्हणाले की, शहरांच्या उभारणीत, उद्योगांच्या प्रगतीत आणि देशाच्या विकासात श्रमिकांचा मोलाचा वाटा आहे. प्रत्येक इमारतीच्या पायाभरणीपासून ते विकासाच्या प्रत्येक टप्प्यापर्यंत त्यांचा घाम आणि त्याग दडलेला आहे. मात्र, त्यांच्या समस्यांकडे अनेकदा दुर्लक्ष होते. "श्रमिकांच्या हक्कासाठी आवाज उठवताना त्यांच्या संघर्षामागील मेहनत आणि त्याग कधीच खचून देत नाही," असे सांगत त्यांनी श्रमिकांच्या जिद्दीचे कौतुक केले, दिवसेंदिवस संघटित कामगार कमी होत असून असंघटित कामगारांचे प्रमुख प्रमाण वाढत असल्याने समाजात आर्थिक दरी ही भविष्यात वाढत जाणार आहे, त्यामुळे रोजगाराबरोबरच छोट्या उद्योगांवर देखील परिणाम होतील अशी भीती त्यांनी यावेळी व्यक्त केली.

यावेळी त्यांनी केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजनांचा उल्लेख करत श्रमिकांच्या जीवनात झालेल्या सकारात्मक बदलांवरही प्रकाश टाकला. पंतप्रधान आवास योजना आणि एसआरए प्रकल्पांमुळे लाखो श्रमिकांना राहण्यासाठी घरे उपलब्ध झाली असून यासाठी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे त्यांनी आभार मानले. तसेच, श्रमिकांच्या न्याय हक्कांच्या संरक्षणासाठी आणखी सक्षम व मूलभूत कायद्यांची आवश्यकता असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

या मेळाव्यात विविध क्षेत्रातील मान्यवर, उद्योजक, युनियन प्रतिनिधी आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शंकरराव शितोळे, जयदेव अक्कलकोट (चाकण उद्योजक संघटना अध्यक्ष), दीपक पाटील, दिनेश पाटील, ओमकार जोकारे, अंकुश वाघमारे, लताताई पाटील, अमोल घोरपडे, दत्तात्रय गायकवाड, कैलास गव्हाणे, शिरीष सासवडे यांच्यासह अनेकांनी सहभाग नोंदवला.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### 'किस्से सिनेमाचे' कार्यक्रमाचा ज्येष्ठ नागरिकांनी घेतला लाभ

पिंपळे सौदागर (दैनिक संध्या) : चित्रपट सृष्टीतील पडद्यामागच्या घटना, काही हळवे प्रसंग आणि मजेदार किस्स्यांच्या आठवणीने पिंपळे सौदागर येथील ज्येष्ठ नागरिकांमध्ये रुपेरी स्मृतींच्या आठवणींना उजाळा मिळाला. निमित्त होते ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनच्या मासिक मेळाव्यातील ख्यातनाम लेखक आणि सिनेपत्रकार धनंजय कुलकर्णी यांच्या व्याख्यानाचे. पिंपळे सौदागर येथील स्व. बाळासाहेब कुंजीर क्रिडांगणावर गुरुवार दि.३० रोजी आयोजित करण्यात आलेल्या "किस्से सिनेमाचे" या कार्यक्रमात धनंजय कुलकर्णी यांनी "कुली" चित्रपटाच्या वेळी अमिताभ बच्चन अपघातातून बरा होण्यासाठी बडोद्याच्या चाहत्याने मुंबईपर्यंत उलट्या पावलाने केलेला प्रवास, पुण्यातील पानशेत धरण फुटल्यानंतर होडी ढकलण्यासाठी ग. दि. माडगूळकर यांनी केलेली मदत, करवा चौथमुळे जितेंद्रचे वाचलेले प्राण, धर्मेंद्रची मुकेशने मागितलेली माफी आदि आठवणी सांगून उपस्थितांची दाद मिळवली. ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. सुभाषचंद्र पवार, सचिव सखाराम ढाकणे, उपाध्यक्ष अनिल कुलकर्णी तसेच शकुंतला शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम झाला. भामिनी महाले, शोभा राजगुरे, निर्मला कासार आणि सुरेखा पाटील यांनी एक मे चे औचित्य साधून महाराष्ट्र गीताने कार्यक्रमाचा प्रारंभ केला. प्रमुख पाहुण्यांचे स्वागत असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. सुभाषचंद्र पवार यांनी केले. सुत्रसंचलनाची जबाबदारी भामिनी महाले यांनी सांभाळली तर सखाराम ढाकणे यांनी आभार मानले.

### 3 वर्षांच्या चिमुरड्यावर अत्याचार करून निर्घृण खून; आरोपीला पोलिसांकडून अटक




पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयांतर्गत येणाऱ्या महाळुंगे दक्षिण पोलीस स्टेशनच्या हद्दीत एक माणुसकीला काळीमा फासणारी घटना उघडकीस आली आहे. खालुंब्रे गावात एका ३ वर्षांच्या चिमुरड्यावर लैंगिक अत्याचार करून त्याची गळा चिरून निर्घृण हत्या करण्यात आली. या धक्कादायक प्रकरणात पोलिसांनी एका अल्पवयीन आरोपीला पुणे रेल्वे स्थानक परिसरातून ताब्यात घेतले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मृत मुलगा हा मूळचा मध्य प्रदेशचा असून त्याचे कुटुंब खालुंब्रे येथे भाड्याने राहत होते. काल संध्याकाळी तो घरासमोर खेळत असताना बेपत्ता झाला होता. आरोपीने त्याचे अपहरण करून निर्जन ठिकाणी नेले, तिथे त्याच्यावर अत्याचार केला आणि त्यानंतर गळा चिरून त्याची हत्या केली. घटनेचे गांभीर्य ओळखून महाळुंगे पोलिसांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवली. तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी आरोपीचा माग काढला. आरोपी हा मूळचा बिहारचा असून तो गुन्हा करून राज्याबाहेर पळून जाण्याच्या तयारीत होता. मात्र, तो रेल्वे पकडण्यापूर्वीच पोलिसांनी त्याला पुणे रेल्वे स्थानक परिसरातून शिताफीने ताब्यात घेतले. या घटनेमुळे खालुंब्रे परिसरात संतापाची लाट उसळली असून, परिसरात शोककळा पसरली आहे. महाळुंगे दक्षिण पोलीस या प्रकरणाचा पुढील कायदेशीर तपास करत आहेत.

# धूळ नियंत्रणासाठी महापालिका ॲक्शन मोडवर

**नियमभंग करणारे ४ आर.एम.सी. प्रकल्प सील**



**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी चिंचवड शहरातील वायू प्रदूषण रोखण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकडून आरएमसी (रेडी मिक्स काँक्रीट) प्रकल्पांवर विशेष तपासणी मोहीम सातत्याने राबविण्यात येत आहे. पर्यावरणीय नियमांचे उल्लंघन करणाऱ्या प्रकल्पांविरोधात कठोर कारवाई करण्यात येत असून, धूळ प्रदूषण रोखण्यासाठी प्रत्यक्ष अंमलबजावणीवर भर दिला जात आहे. महापौर रवि लांडगे यांच्या सूचनेनुसार करण्यात आलेल्या या कारवाई दरम्यान महापालिकेच्या उपद्रव शोध पथकाने पुनावळे, मोशी आणि पिंपळे सौदागर परिसरातील १० आरएमसी प्रकल्पांची पाहणी केली. तपासणीदरम्यान ४ प्रकल्पांमध्ये गंभीर त्रुटी आढळून आल्या. धूळ नियंत्रणासाठी आवश्यक यंत्रणा कार्यरत नसणे, परिसरात स्वच्छतेचा अभाव, तसेच कच्चा माल उघड्यावर साठविण्यात येत असल्याने धूळ प्रदूषण होत असल्याचे निदर्शनास आले. याअनुषंगाने फरांदे आरएमसी प्रकल्प, मोशी, यश आरएमसी प्रकल्प, चिंचवड, राम ग्रुप क्रिस्टल वन आरएमसी प्रकल्प, मोशी तसेच आसवानी असोसिएट्स जी.के. आरएमसी प्रकल्प, पिंपळे सौदागर या चार प्रकल्पांना तात्काळ लाखबंद (सील) करण्यात आले आहे.

दरम्यान, इतर प्रकल्पांना धूळ नियंत्रणासाठीच्या उपाययोजना तातडीने करण्याचे निर्देश देण्यात आले असून, नियमांचे पालन न केल्यास पुढील टप्प्यात अधिक कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशाराही देण्यात आला आहे. शहरातील आरएमसी प्रकल्पांसह बांधकाम आणि औद्योगिक प्रकल्पांवर महापालिकेकडून सातत्याने लक्ष ठेवण्यात येत आहे.

पर्यावरण विभागाकडून प्रदूषण नियंत्रणासाठी अशा तपासणी मोहिमा पुढेही सुरू राहणार आहेत.

"प्रदूषण नियंत्रणासाठी केवळ नियम बनविणे पुरेसे नसून त्यांची प्रभावी अंमलबजावणी होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. आरएमसी प्रकल्पांमध्ये आवश्यक प्रदूषण नियंत्रण उपाययोजना न आढळल्यास तात्काळ कारवाई करण्यात येत आहे. पुढील काळातही तपासणी मोहीम अधिक तीव्र करून नियमभंग करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार आहे."
**– संजय कुलकर्णी, मुख्य अभियंता, पिंपरी चिंचवड महापालिका.**

शहरातील धूळ प्रदूषण हे नागरिकांच्या आरोग्यासाठी धोका ठरू शकते आणि याकडे दुर्लक्ष करण्याची महापालिकेकडे अजिबात मुभा नाही. आरएमसीसह सर्व बांधकाम प्रकल्पांनी पर्यावरणीय नियमांचे केवळ पालनच नाही तर जबाबदारीने अंमलबजावणी करणे अत्यावश्यक आहे. नियमभंग करणाऱ्यांवर कारवाई ही केवळ औपचारिकता नसून ती सातत्याने आणि कठोरपणे सुरू राहील. नागरिकांना स्वच्छ व सुरक्षित वातावरण देणे ही महापालिकेची जबाबदारी असून त्यासाठी कोणतीही तडजोड केली जाणार नाही.
**– रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

"शहरातील वायू प्रदूषणावर प्रभावी नियंत्रण मिळविणे ही महापालिकेची सर्वोच्च प्राधान्याची बाब आहे. बांधकाम व औद्योगिक प्रकल्पांनी पर्यावरणीय नियमांचे काटेकोर पालन करणे अत्यावश्यक असून, कोणत्याही प्रकारचा नियमभंग सहन केला जाणार नाही. प्रदूषण करणाऱ्या घटकांवर सातत्याने कारवाई करून शहरातील वायू गुणवत्ता सुधारण्यासाठी महापालिका प्रशासन कटिबद्ध आहे."
**– डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.**

शहरातील नागरिकांना स्वच्छ, सुरक्षित आणि निरोगी वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी महापालिका प्रशासन कटिबद्ध असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. नियमांचे पालन न करणाऱ्या प्रकल्पांवर पुढील काळातही कठोर कारवाई सुरू ठेवण्यात येणार असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

## मावळात दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये ४ जणांचा पाण्यात बुडून मृत्यू

**मावळ (दै. संध्या)**

शुक्रवारी कामगार दिनाच्या सुट्टीत फिरण्यासाठी गेलेल्या पर्यटकांवर दुर्दैवी संकट कोसळले आहे. मावळ तालुक्यातील जाधववाडी धरण (नवलाख उंबरे) आणि साळुंब्रे येथील पवना नदीत बुडून एकूण चार तरुणांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. जाधववाडी धरण परिसरात फिरण्यासाठी आलेल्या काही पर्यटकांपैकी अजय गारुडे, संतोष एडके आणि अनिकेत पवार हे पाण्यात पोहण्यासाठी उतरले. पाण्याची खोली व प्रवाहाचा अंदाज न आल्याने एकूण पाच जण बुडाले. त्यापैकी दोघांना स्थानिकांच्या मदतीने सुखरूप बाहेर काढण्यात आले, मात्र तिघांचा दुर्दैवी मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच स्थानिक रेस्क्यू पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. बुडालेल्या तरुणांना बाहेर काढून सीपीआर देण्यात आला, परंतु बराच वेळ उलटल्यामुळे त्यांना वाचवण्यात अपयश आले. दुसरी घटना साळुंब्रे येथील जुन्या दगडी पुलाजवळ घडली. मनोज भारत गौतम (वय २५, मूळ रा. उत्तर प्रदेश) हा तरुण सकाळी सुमारे ८ वाजता नदीत पोहण्यासाठी उतरला होता. पाण्याची खोली न समजल्याने तो बुडाला. मनोज हा स्थानिक काळोखे पाईप लाईन कंपनीत काम करत होता. घटनेनंतर वन्यजीव रक्षक मावळ संस्था, शिवदुर्ग मित्र लोणावळा तळेगाव दाभाडे अग्निशामक दल आणि NDRF च्या पथकाने तातडीने बचावकार्य सुरू केले. अथक प्रयत्नांनंतर सर्व मृतदेह बाहेर काढण्यात आले. जाधववाडी येथील तिघांना 'विरा ॲम्बुलन्स'च्या मदतीने जनरल हॉस्पिटल, तळेगाव दाभाडे येथे नेण्यात आले, तर साळुंब्रे येथील तरुणाला पुढील तपासणीसाठी पवना हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले.

# राहुल गांधींच्या प्रतिमेला जोडे मारून केला निषेध

**'नारी शक्ती वंदन विधेयका'ला विरोध करणाऱ्या काँग्रेस विरोधात पिंपरी-चिंचवडमध्ये महिलांचा 'आक्रोश मोर्चा'**

**पिंपरी (दै. संध्या)**






देशातील महिला शक्तीचा अपमान आणि काँग्रेस आघाडी सरकारच्या धोरणांचा निषेध करण्यासाठी पिंपरी-चिंचवड शहर भारतीय जनता पार्टी महिला मोर्चाच्या वतीने भव्य 'आक्रोश मोर्चा' काढण्यात आला. दीपस्तंभ चौक ते गाय वासरू चौक दरम्यान निघालेल्या या मोर्चाचा समारोप मोहन नगर येथील दत्त मंदिर चौक येथे जाहीर सभेने झाला.

यावेळी आंदोलक महिलांनी राहुल गांधींच्या प्रतिमेला जोडे मारून आपला तीव्र संताप व्यक्त केला. या आंदोलनाचे नेतृत्व भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे आणि महिला मोर्चा अध्यक्षा सुजाता पालांडे यांनी केले. यावेळी आमदार उमा खापरे आणि आमदार अमित गोरखे यांची प्रमुख उपस्थिती होती.

केंद्र सरकारने आणलेल्या 'नारी शक्ती वंदन विधेयका'चे स्वागत करत असतानाच, विरोधकांकडून महिलांच्या बाबतीत होणाऱ्या भूमिकेचा मान्यवरांनी आपल्या भाषणातून कडाडून निषेध केला. "महिलांचा अपमान करणाऱ्या काँग्रेस आघाडी सरकारचा धिक्कार असो" अशा घोषणांनी यावेळी परिसर दणाणून गेला होता.

या आंदोलनामध्ये संघटन सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, भाजपा गटनेता प्रशांत शितोळे, आरपीआय गटनेते कुणाल वाव्हळकर, नगरसेवक राहुल कलाटे, सुरेश भोईर, राजू दुर्गे, नवनाथ जगताप, अमित बाबर यांच्यासह उपमहापौर शर्मिला बाबर, सरचिटणीस मधुकर बच्चे, नगरसेविका स्नेहा कलाटे, आरती चोंधे, रेश्मा चेतन भुजबळ, श्रुती वाकडकर, पल्लवी जगताप, अर्चना सस्ते, पल्लवी वाल्हेकर, शालिनी गुजर, शैलजा मोरे, सोनाली गव्हाणे, कविता भोंगळे आणि मनिषा पवार या महिला लोकप्रतिनिधींनी सक्रिय सहभाग नोंदवला. तसेच महिला मोर्चाच्या पदाधिकारी अनघा रुद्र, ऐश्वर्या बाबर, मीनल यादव, रोहिणी मांढरे, रेश्मा सालेकर, दिपाली कलापुरे, कविता हिंगे, स्वाती जाधव, जोस्ना कलाटे, संजना यादव, स्वाती देशमुख, स्वाती पवार, नीतू भालेराव, नीता कुशारे आणि शोभा डोळस यांसह सर्वसामान्य महिला नागरिकांनी देखील मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपला निषेध नोंदवला. नारी शक्तीचा अपमान करणाऱ्यांना समाज कधीही माफ करणार नाही आणि केंद्र सरकारच्या महिला हिताच्या निर्णयांना विरोध करणाऱ्यांना चोख प्रत्युत्तर दिले जाईल, असा इशारा यावेळी देण्यात आला.

# निसर्ग, नागरिक आणि शहराच्या भविष्याचा सामूहिक संकल्प

**पिंपरी (दै. संध्या)**



पिंपरी-चिंचवड शहरात वाढत्या नागरीकरणामुळे निर्माण होणारे वायू प्रदूषण, वाढती उष्णता, घटत चाललेली हरितक्षेत्रे आणि बदलत चाललेले हवामान यांचा नागरिकांच्या आरोग्यावर थेट परिणाम होत आहे. उष्णतेच्या लाटा, वायू गुणवत्ता खालावणे आणि पावसाच्या अनियमित पद्धती या चिंताजनक बाबी लक्षात घेता, शहरातील पर्यावरणीय संतुलन पुन्हा प्रस्थापित करणे, कार्बन उत्सर्जन कमी करणे, तापमान नियंत्रित ठेवणे आणि नागरिकांना निरोगी जीवनमान उपलब्ध करून देणे अत्यंत गरजेचे झाले आहे. या पार्श्वभूमीवर "हरित पिंपरी-चिंचवड अभियान" राबविण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय मा. महापौर रवि लांडगे यांनी घेतला आहे. राज्याचे मा. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी राज्यभर वृक्ष लागवडीचा संकल्प जाहीर करून पर्यावरण संवर्धनाचा जो व्यापक दृष्टिकोन दिला आहे, त्याच प्रेरणेने तसेच पिंपरी-चिंचवडकर नागरिकांकडून विविध माध्यमांतून प्राप्त झालेल्या सकारात्मक सूचनांचा सन्मान राखत हे अभियान हाती घेण्यात येणार आहे.

मा. महापौरांनी स्पष्टपणे नमूद केले आहे की, शहरातील प्रत्येक नागरिकाला स्वच्छ, निरोगी आणि शाश्वत पर्यावरण मिळणे ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून ती प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी आहे. "एक झाड लावा, प्रदूषण दूर पळवा!" या प्रभावी संदेशातून प्रत्येक नागरिकाने किमान एक झाड लावून त्याच्या संगोपनाची जबाबदारी स्वीकारावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

शहरातील वाढते तापमान कमी करणे, वायू प्रदूषणावर नियंत्रण ठेवणे, ऑक्सिजनचे प्रमाण वाढविणे, पावसाचे पाणी जमिनीत मुरवून जलसंतुलन राखणे तसेच जैवविविधतेचे संवर्धन करणे या सर्व दृष्टीने वृक्षारोपण अत्यंत आवश्यक आहे. याच उद्देशाने हे अभियान केवळ वृक्ष लागवडीपुरते मर्यादित न राहता पर्यावरण संवर्धनाची व्यापक लोकचळवळ म्हणून राबविण्यावर भर दिला जाणार आहे.

या अभियानाची अंमलबजावणी नियोजनबद्ध व टप्प्याटप्प्याने करण्यात येणार असून, सर्व क्षेत्रीय कार्यालयांमार्फत मोकळ्या जागा, उद्याने, रस्त्यांवरील डिव्हायडर, नव्याने विकसित होणारे रस्ते, शासकीय व महापालिका इमारतींचे परिसर तसेच नद्या व नाले परिसर यांचे सविस्तर सर्वेक्षण करून योग्य ठिकाणी वृक्षारोपण केले जाणार आहे. पर्यावरणाशी सुसंगत, कमी पाणी लागणा-या आणि जास्त टिकाऊ देशी वृक्षप्रजातींची निवड करून पावसाळ्यापूर्वी आवश्यक तयारी पूर्ण केली जाईल व पावसाळ्यात मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड केली जाईल.

## रहाटणीत महापालिका शाळेची नवीन इमारत तात्काळ उभारावी

**नगरसेविका अर्चना तापकीर यांचे शिक्षण विभागाला निवेदन**

**पिंपरी (दै. संध्या)**



रहाटणी प्रभाग क्रमांक २७ येथील महापालिका शाळेची अवस्था अत्यंत गंभीर व चिंताजनक बनली असून विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने तात्काळ नवीन शाळा इमारत उभारण्यात यावी, अशी मागणी नगरसेविका अर्चना विनोद तापकीर यांनी शिक्षण समिती सभापती व शिक्षण अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. अर्चना तापकीर यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, रहाटणी येथील महापालिका शाळेसाठी जागा आरक्षित असूनही अनेक वर्षांपासून नवीन इमारत उभारण्याचे काम रखडले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना अपुऱ्या व असुरक्षित जागेत शिक्षण घ्यावे लागत आहे. काही विद्यार्थी पत्र्याच्या खोल्यांमध्ये बसून शिक्षण घेत असल्याने त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. तसेच विद्यार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत असल्यामुळे उपलब्ध जागा अपुरी पडत असून शिक्षण प्रक्रियेत अनेक अडचणी निर्माण होत आहेत. विद्यार्थ्यांच्या आरोग्य, सुरक्षितता आणि शैक्षणिक विकासाचा विचार करता आरक्षित जागेवर तात्काळ सुसज्ज व नवीन शाळा इमारत उभारण्याची आवश्यकता असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

# डिजिटल जनगणनेत सहभागी व्हा, देशाच्या प्रगतीत हातभार लावा

**पिंपरी (दै. संध्या)**

- भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांचे नागरिकांना आवाहन
- पुणे महानगर क्षेत्रामध्ये स्व-जनगणनाबाबत प्रशासनाचीही जनजागृती



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात १६ व्या राष्ट्रीय जनगणनेचा ऐतिहासिक टप्पा सुरू झाला आहे. १ मे २०२६ पासून देशभरात 'स्व-गणनेला' (Self-Enumeration) प्रारंभ झाला असून, पिंपरी-चिंचवडमधील नागरिकांनी या पहिल्या डिजिटल जनगणनेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी केले आहे. आमदार महेश लांडगे यांनी आज स्वतः आपल्या कुटुंबीयांसह ऑनलाइन पद्धतीने स्व-गणना पूर्ण केली. यावेळी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाचे अधिकारी सुरज टिंगरे, किरण गव्हाणे, अरुण गुंडगळ, राहुल शेडगे उपस्थित होते. या मोहिमेबाबत माहिती देताना आमदार लांडगे म्हणाले की, "ही देशातील पहिली डिजिटल जनगणना असून प्रत्येक नागरिकाचा सहभाग यामध्ये मोलाचा आहे. महाराष्ट्रभरातील जनतेने १ ते १५ मे या कालावधीत se.census.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन आपल्या कुटुंबाची माहिती भरावी आणि आपली जबाबदारी पार पाडावी."

"आपली जनगणना, आपला विकास हा मंत्र समोर ठेवून आपण सर्वांनी जबाबदार नागरिक म्हणून या प्रक्रियेत सहभागी होणे आवश्यक आहे. डिजिटल माध्यमाचा वापर करून आपली माहिती अचूकपणे नोंदवल्यास देशाच्या भविष्यातील नियोजनाला गती मिळेल," असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला. आमदार लांडगे यांनी स्वतः पुढाकार घेतल्यामुळे शहरात या मोहिमेबाबत जनजागृती निर्माण होत असून, जास्तीत जास्त नागरिकांनी १५ मे पूर्वी आपली नोंदणी पूर्ण करावी, असे आवाहन प्रशासनाच्या वतीनेही करण्यात आले आहे.

"देशाच्या सर्वांगीण विकासासाठी अचूक माहिती असणे ही काळाची गरज आहे. १६ व्या राष्ट्रीय जनगणनेच्या निमित्ताने प्रथमच आपल्याला 'डिजिटल स्व-गणने'ची संधी मिळाली आहे. मी माझे कर्तव्य पार पाडले आहे, तुम्हीही आजच आपली नोंदणी पूर्ण करा आणि जबाबदार नागरिकत्वाचा परिचय द्या. आपली जनगणना, आपला विकास' हा मंत्र केवळ शब्द नसून ती आपल्या उज्ज्वल भविष्याची पायाभरणी आहे. चला, डिजिटल जनगणनेत सहभागी होऊन सशक्त भारताच्या निर्मितीत आपले योगदान देऊया!
**– महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

## थोडक्यात पण महत्वाचे...



### ज्ञानगंगा इंग्लिश मीडियम स्कूलचा पहिल्याच बॅचचा 100% निकाल

आळंदी (दैनिक संध्या) : येथील ज्ञानगंगा इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनियर कॉलेजच्या विज्ञान शाखेच्या बारावी परीक्षेचा निकाल अत्यंत उज्ज्वल लागला असून, संस्थेच्या पहिल्याच बॅचने शंभर टक्के निकालाची नोंद करत यशाची नवी परंपरा निर्माण केली आहे. शैक्षणिक वर्ष २०२५–२६ मधील या बॅचमधील सर्व विद्यार्थ्यांनी यश संपादन करत संस्थेचा लौकिक उंचावला आहे. विशेष बाब म्हणजे, बहुतांश विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणीत यश मिळवत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. या यशामागे विद्यार्थ्यांचा सातत्यपूर्ण अभ्यास, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य हे महत्त्वाचे घटक ठरले असल्याचे संस्थेकडून सांगण्यात आले. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा.विजय गुळवे व सचिव वैष्णवी गुळवे यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांनी भविष्यातही मेहनत आणि प्रगतीचा ध्यास कायम ठेवावा, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.दरम्यान, प्राचार्य व शिक्षकवृंदांनीही विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत भविष्यातही अशाच यशाची परंपरा कायम राखण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

### अखिल भारतीय छावा संघटनेच्या ग्रामीण विभागाच्या अध्यक्षपदी नारायण जाधव



जेजुरी (दैनिक संध्या) : अखिल भारतीय छावा संघटना महाराष्ट्र राज्य, पुणे जिल्हा ग्रामीण विभागाच्या अध्यक्षपदी जेजुरी येथील सामाजिक कार्यकर्ते नारायण वामन जाधव यांनी निवड करण्यात आली आहे. या संघटनेचे पश्चिम महाराष्ट्राचे कार्याध्यक्ष प्रेम भुरे यांनी नारायण जाधव यांना निवडीचे पत्र दिले. नारायण जाधव यांनी सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. विविध संघटनेवर ते पदाधिकारी म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या निवडी बद्दल विविध संघटनांनी त्यांचे अभिनंदन केले.

### ग्रामोन्नती मंडळाचा विद्यार्थी बनला पीएसआय

नारायणगाव (दैनिक संध्या) : ग्रामोन्नती मंडळ कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय नारायणगाव व राष्ट्रीय छात्र सेना विभाग वर्ष 2025 26 या शैक्षणिक वर्षात एकूण दहा कॅडेट उपनिरीक्षकपदी एअर फोर्स , सेंट्रल गव्हर्मेंट सेक्युरिटी गार्ड, इंडियन डिटेक्टिव्ह फोर्स व पोलीस मध्ये भरती झाले आहेत. त्यांचा सत्कार आदरणीय कृषीरत्न व ग्रामोन्नती मंडळ कार्याध्यक्ष माननीय अनिलतात्या मेहेर याच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यामध्ये एमपीसी मार्फत झालेल्या परीक्षेत उपनिरीक्षकपदी (PSI) सुदर्शन उर्फ दिनेश सुखदेव माताडे त्याची निवड झाली. समाधान रासकर अक्षदा अनिल डोंगरे अभिषेक वायकर विक्रांत मधे दुर्गा सिकदर लोखंडे तेजल प्रसाद वाणी नयना बोम्बे राजपुरे शिवम वाणी इंडियन डिटेक्टिव्ह फोर्स मध्ये निवड तसेच प्रवीण तुकाराम कानडे सेंट्रल गव्हर्नमेंट सेक्युरिटी गार्डमध्ये भरती झाला आहे यांना पुस्तक व पेन म्हणून भेटवस्तू देण्यात आली या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आनंद कुलकर्णी सर्व महाविद्यालयाचे प्राध्यापक व शिक्षक तर कर्मचारी उपस्थित होते या कार्यक्रमाचे नियोजन डॉ. कॅप्टन दिलीप शिवणे यांनी केले.

### जुन्नर तालुक्यात जलजीवन मिशन रखडले; पाणीपुरवठा योजनांवर प्रश्नचिन्ह

जुन्नर (दैनिक संध्या) : जुन्नर तालुक्यात जलजीवन मिशनअंतर्गत सुरू असलेल्या पाणीपुरवठा योजनांची कामे मोठ्या प्रमाणावर रखडली असून, ‘हर घर नलसे जल’चे उद्दिष्ट अद्याप पूर्णत्वास आलेले नाही. तालुक्यातील 155 गावांपैकी केवळ 49 गावांत योजना पूर्ण झाल्याचे सांगितले जात असले तरी पूरक व वाढीव कामे अपूर्ण असल्याने अनेक ठिकाणी प्रत्यक्ष पाणीपुरवठा सुरू झालेला नाही. ग्रामीण भागातील महिलांच्या डोक्यावरचा पाण्याचा हंडा कायमस्वरूपी उतरवण्याच्या उद्देशाने केंद्र व राज्य सरकारच्या संयुक्त निधीतून ही योजना राबविण्यात येत आहे. मात्र, प्रत्यक्षात 100हून अधिक गावांमध्ये कामे अपूर्ण असल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढली आहे. काही ठिकाणी पाइपलाइन टाकण्याचे काम सुरू आहे, तर काही ठिकाणी जुनी लाईन काढण्याचे काम सुरू असून, अनेक गावांत नळजोडण्या झालेल्याच नाहीत. काही ठिकाणी टाकलेले पाईप चोरीला गेल्याच्या घटनाही समोर आल्या आहेत. कामे रखडण्यामागे ठेकेदारांना निधी न मिळणे हे मुख्य कारण असल्याचे स्पष्ट होत आहे. गेल्या अडीच वर्षांपासून बिले मिळाली नसल्याने ठेकेदार आर्थिक अडचणीत सापडले आहेत. यामुळे त्यांनी जुन्नर पंचायत समिती कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर ‘काम बंद’ आंदोलनाचा फ्लेक्स लावून निषेध नोंदवला आहे.

### पिंगोरीच्या कुस्ती आखाड्यात प्रतीक जगतापचा दबदबा

वाल्हे (दैनिक संध्या) : पुरंदर तालुक्यातील पिंगोरी येथे श्री वाघेश्वरी देवीच्या यात्रे निमित्त पार पडलेल्या ऐतिहासिक कुस्ती आखाड्यात सासवडच्या प्रतीक जगताप याने दमदार कामगिरी करत मानाची कुस्ती जिंकली आहे.यावेळी अंतिम सामन्यात त्याने अक्षय कामठे याला अवघ्या तीन मिनिटांत चितपट करून विजेतेपद पटकावले. या विजयाबद्दल त्याला गावच्या वतीने रोख ५१ हजार रुपये आणि गदा देऊन सन्मानित करण्यात आले. सैनिकांचे गाव म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पिंगोरीत कुस्तीचा आखाडाच यात्रेचा प्रमुख आकर्षण ठरला.या कुस्ती आखाड्यात ८० पैलवानांनी सहभाग घेतला होता.अखेरची ५१ हजार रुपयांची मानाची कुस्ती प्रेक्षकांसाठी विशेष आकर्षण ठरली. यावेळी कुस्ती आखाड्याचे नियोजन प्रकाश शिंदे यांनी केले होते. तर पंच म्हणून आबा जगदाळे, माऊली खोपडे, तुषार गोळे आणि माणिक भिसे यांनी काम पाहिले.



## चाकणला दोडका, गवार व भेंडीची प्रचंड आवक; पालेभाज्यांचे भाव तेजीत

चाकण (दै. संध्या)

खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटयार्ड मध्ये लसुन, टोमॅटो, हिरवी मिरची, दोडका, गवार व भेंडीची प्रचंड आवक झाली. फळभाज्यांसह पालेभाज्यांची किरकोळ आवक झाल्याने भाव कडाडले. एकूण उलाढाल ५ कोटी ८० लाख रुपये झाली.

चाकण येथील बाजारात कांद्याची एकूण आवक ५ हजार क्विंटल झाली. कांद्याला कमाल भाव ७०० ते १,३०० रुपये मिळाला. बटाट्याची एकूण आवक १,५०० क्विंटल झाली. बटाट्याचा कमाल भाव १,३०० रुपयांवरच स्थिरावला. लसणाची एकूण आवक ५० क्विंटल झाली. लसणाला १२ हजार रुपये कमाल भाव मिळाला.



शेतीमालाची आवक व बाजारभाव पुढीलप्रमाणे - कांदा - एकूण आवक - ५,००० क्विंटल.भाव क्रमांक - १.१,३०० रुपये, भाव क्रमांक २.१,००० रुपये, भाव क्रमांक ३. ७००., बटाटा - एकूण आवक - १,५०० क्विंटल. भाव क्रमांक १.१,३०० रुपये, भाव क्रमांक २.१,००० रुपये, भाव क्रमांक ३.८०० रुपये.

फळभाज्या - फळभाज्यांच्या बाजारात एकूण आवक क्विंटलमध्ये व प्रतीदहा किलोंसाठी मालाला मिळालेले भाव कंसात पुढील प्रमाणे - टोमॅटो - २९२ क्विंटल (२,००० ते २,५०० रू.), कोबी - १८० क्विंटल (६०० ते ७०० रू.), फ्लॉवर - १९५ क्विंटल (१,००० ते १,२०० रु.), वांगी - ७४ क्विंटल (२,००० ते २,५०० रु.), भेंडी - ८२ क्विंटल (२,००० ते ३,००० रु.), कारली - ६४ क्विंटल ( २,५०० ते ३,५०० रु.), दुधीभोपळा - ५२ क्विंटल (१,५०० ते २,००० रु.), काकडी - ७८ क्विंटल (२,००० ते २,५०० रु.), फरशी - ३४ क्विंटल (६,००० ते ७,००० रु.), वालवड - ५६ क्विंटल (३,५०० ते ४,००० रुपये), ढोबळी मिरची - १४९ क्विंटल (३,००० ते ४,००० रु.), चवळी - ५२ क्विंटल (२,००० ते २,५०० रु.), वाटाणा - १० क्विंटल (९,००० ते १०,००० रू. ), शेवगा - ५० क्विंटल (२,५०० ते ३,००० रु.), गाजर - १५० क्विंटल (१,५०० ते २,००० रु.), गवार - ५२ क्विंटल (३,००० ते ३,५०० रु. ), आले - १६० क्विंटल (४,००० ते ४,५०० रु.), ओली भुईमूग शेंग - ६० पोती (४,५०० ते ५,००० रूपये)

बाजारात पालेभाज्यांची एकूण आवक जुड्यांमध्ये व भाज्यांना मिळालेले भाव पुढीलप्रमाणे - मेथी - एकूण ७ हजार ४९० जुड्या (१,५०० ते २,५०० रुपये ), कोथिंबीर - एकूण १९ हजार ९६५ जुड्या (१,००० ते २,५०० रुपये,), शेपू - एकूण ३ हजार ०५४ जुड्या (१,००० ते १,४०० रुपये ), पालक - एकूण ३ हजार ६५१ जुड्या (६०० ते १,०००).

## पुरंदर तालुक्याचा बारावीचा निकाल ९२.०६ टक्के

सासवड (दै. संध्या)

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने फेब्रुवारीमध्ये घेण्यात आलेल्या बारावी परीक्षेचा निकाल जाहीर झाला. यामध्ये पुरंदर तालुक्याने ९२.०६ टक्के निकाल मिळवला. तालुक्यातील काही विद्यालयांनी शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखली असून, यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. पुरंदर तालुक्यातून या परीक्षेसाठी एकूण २३५८ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते, त्यापैकी २१७१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. निकालाच्या गुणवत्तेनुसार ९३ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवले असून, ३८७ विद्यार्थी प्रथम श्रेणीत, २२९६ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत आणि ३९५ विद्यार्थी उत्तीर्ण श्रेणीत यशस्वी झाले आहेत.

महाविद्यालयांचा निकाल सरासरी व शाखानिहाय पुढीलप्रमाणे : जिजामाता हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, जेजुरी:(९९.२० टक्के) : विज्ञान शाखा १०० टक्के, वाणिज्य शाखा १०० टक्के, कला शाखा ९६.६१ टक्के. डॉ. शंकरराव कोलते ज्यु. कॉलेज, पिसर्वे: (९७.३६ टक्के) :विज्ञान शाखा १०० टक्के, वाणिज्य शाखा ९७.३६ टक्के, कला शाखा ९५.३४ टक्के. कर्मवीर भाऊराव पाटील ज्यु. कॉलेज, परिंचे: (९१.१७ टक्के) : विज्ञान शाखा १०० टक्के, वाणिज्य शाखा ९५ टक्के, कला शाखा ७०.५८ टक्के. महर्षी वाल्मिक ज्युनिअर कॉलेज, वाल्हे: (९५.६५ टक्के) :कला शाखा १०० टक्के, विज्ञान शाखा ९७.५० टक्के, वाणिज्य शाखा ९१.१७ टक्के. शिवाजी इंग्लिश मीडियम स्कूल, सासवड: १०० टक्के. श्री केदारेश्वर ज्युनिअर कॉलेज, काळदरी: १०० टक्के. पुरंदर ज्युनिअर कॉलेज, सासवड: (८८.६३ टक्के) : विज्ञान शाखा ९८.५९ टक्के, वाणिज्य शाखा ८६.२० टक्के, कला शाखा ७४.७१ टक्के. वाघीरे महाविद्यालय, सासवड: (८९.२९ टक्के) : विज्ञान शाखा ९८.२३ टक्के, वाणिज्य शाखा ७८.१८ टक्के, कला शाखा ७७.६६ टक्के. किलाचंद ज्युनिअर कॉलेज, निरा : ( ९२.७३ टक्के): विज्ञान शाखा ९७.७० टक्के, वाणिज्य ९२.७३ टक्के, कला शाखा ७९.१६ टक्के. ए. सी. हुंडेकरी ज्यु. कॉलेज, जेजुरी: (९३.९१ टक्के) : वाणिज्य शाखा ९६.५५ टक्के, विज्ञान शाखा ९५.२३ टक्के, कला शाखा ८६.९५ टक्के.

## विद्यार्थी गुणगौरव कार्यक्रमाने महाराष्ट्र दिन साजरा

चोपडज (दै. संध्या)

१ मे महाराष्ट्र दिनानिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चोपडज मध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री.लक्ष्मणराव जगताप यांचे हस्ते ध्वजारोहण करून त्यानंतर विद्यार्थी गुणगौरव कार्यक्रम घेण्यात आला.

यामध्ये वर्षभर शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना शाळा व्यवस्थापन समितीच्या सौजन्याने सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात आले.यामध्ये तालुकास्तरीय यशवंतराव चव्हाण कला क्रीडा स्पर्धेत तृतीय क्रमांक तसेच अजितदादा पवार तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत १० वा क्रमांक प्राप्त श्रीया सागर गाडेकर, मंथन राज्यस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षेत केंद्रस्तरीय गुणवत्ता यादीत चतुर्थ क्रमांक प्राप्त चि.आहिल इम्रान खान व तालुकास्तरीय खो-खो स्पर्धेत मुलींच्या गटात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थिनींना स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

तसेच चालू शैक्षणिक वर्ष सन २०२६-२७ मध्ये इयत्ता पहिलीत प्रवेश घेणाऱ्या नवोदित विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी चोपडजच्या सरपंच मा.सौ.मनीषाताई भोसले होत्या.

यावेळी चोपडज वि.का.से. सोसायटीचे माजी चेअरमन निकम भाऊ, माजी विस्तार अधिकारी मा.श्री.संजय गायकवाड साहेब, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष लक्ष्मण जगताप, सदस्यसागर गाडेकर, सामाजिक कार्यकर्ते संदीप गाडेकर, उमेश गायकवाड, बाबासो धुमाळ, गोरख अण्णा गाडेकर,




संदीप भोसले, अंगणवाडी सेविका श्रीमती लता चव्हाण, मदतनीस पुजा गायकवाड, छाया लोणकर, श्रीम.रेशमा गाडेकर,मदतनीस, ग्रामस्थ,पालक व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक श्री.हनुमंत गाडेकर यांनी, सूत्रसंचालन उपशिक्षिका सौ.हर्षदा जगताप यांनी केले, तर उपस्थितांचे आभार उपशिक्षक श्री. गणेश महामुनी यांनी मानले.

## श्री क्षेत्र वाडेबोल्हाई ग्रामपंचायत सरपंच पदी पल्लवी प्रदीप शिंदे यांची निवड

कोरेगावमुळ (दै. संध्या)

श्री क्षेत्र वाडेबोल्हाई ग्रामपंचायत सरपंच पदी पल्लवी प्रदीप शिंदे यांची निवड झाली असून पल्लवी शिंदे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. तत्कालीन सरपंच वैशाली केसवड यांनी लोकनियुक्त सरपंच पदाचा राजीनामा दिल्यानंतर रिक्त झालेल्या जागेवर

पोटनिवडणूक घेण्यात आली. या पोटनिवडणुकीत पल्लवी प्रदीप शिंदे व सविता श्रीकांत गावडे यांच्यात लोकनियुक्त सरपंच पदासाठी निवडणूक झाली.पल्लवी शिंदे यांना या निवडणुकीत २०५९ मते तर सविता गावडे यांना १४६६ मते मिळाली. लोकनियुक्त सरपंच



पदाच्या निवडणुकीत ५९३ मतांची आघाडी घेऊन पल्लवी प्रदीप शिंदे यांनी विजय संपादन केला. गावातील ग्रामपंचायतचे आजी माजी पदाधिकारी, तरुण मंडळे व महिला प्रतिनिधी यांच्या पाठिंब्याने हा विजय मिळाला असल्याची भावना पल्लवी प्रदीप शिंदे यांनी व्यक्त केली.श्री क्षेत्र वाडेबोल्हाई ग्रामपंचायतच्या माध्यमातून गावाचा सर्वांगीण विकास करण्यावर आगामी काळात भर देणार असल्याचे शिंदे यांनी सांगितले. पल्लवी प्रदीप शिंदे यांची जल्लोषात मिरवणूक काढून कार्यकर्त्यांनी एकमेकांना पेढा भरवत विजयी आनंद साजरा केला. ग्रामपंचायत निवडणुकीच्या अनेक वर्षांच्या कारकिर्दी मधील सर्वसामान्य नागरिकांच्या विश्वासाचा हा एक रोमहर्षक आणि उत्साहवर्धक विजय असल्याचे माजी उपसरपंच संजय भोरडे पाटील यांनी सांगितले.

## महाराष्ट्र दिनी स्व-जनगणना २०२७ ला प्रारंभ; नागरिकांनी सहभागी व्हावे – आमदार बाबाजी काळे

राजगुरुनगर (दै. संध्या)

राज्य शासनाच्या स्व-जनगणना २०२७ उपक्रमाला महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधत १ मेपासून राज्यभर प्रारंभ झाला आहे. नागरिकांनी आपल्या मोबाईलद्वारे कुटुंबाची अचूक माहिती नोंदवून या उपक्रमात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन प्रांताधिकारी अनिल दौंडे यांनी केले आहे.

महाराष्ट्र दिनानिमित्त राजगुरुनगर येथील तहसीलदार कार्यालयाच्या प्रांगणात सकाळी आठ वाजता शासकीय ध्वजारोहण आमदार बाबाजी काळे यांच्या हस्ते पार पडले. यावेळी उपविभागीय अधिकारी अनिल दौंडे, तहसीलदार प्रशांत बेंडसे, पोलिस निरीक्षक



सुभाष चव्हाण, पंचायत समिती सभापती विद्याताई मोहिते, उपसभापती मंगेश सावंत, जिल्हा परिषद सदस्य गणेश बोत्रे, महसूल नायब तहसीलदार राम बीजे, निवासी नायब तहसीलदार चेतन मोरे, पुरवठा निरीक्षक महादेव कुंभार, नायब तहसीलदार मनीषा खैरे, महसूल अधिकारी निलेश घोडके यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

यावेळी स्व-जनगणनेबाबत माहिती देताना प्रांताधिकारी अनिल दौंडे म्हणाले की, मोबाईल लिंकच्या माध्यमातून कुटुंबाशी संबंधित सुमारे ६४ प्रकारची माहिती संकलित केली जाणार आहे. यामुळे राज्यातील लोकसंख्या, उत्पन्नाची साधने व इतर सामाजिक-आर्थिक बाबींचा अचूक आढावा मिळणार आहे.

## पोलिसांनी जप्त केलेल्या दुचाकीमध्ये घुसली थार, अल्पवयीन चालकाकडून १७ दुचाकींचे नुकसान

लोणी काळभोर (दै. संध्या)

महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने सकाळी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात झेंडा वंदन झाल्यानंतर थोडयाच वेळात पोलिसांनी विविध गुन्हयात जप्त केलेल्या दुचाकीमध्ये थार घुसून १७ दुचाकींचे नुकसान केल्याची घटना लोणी काळभोर पोलीस ठाण्याच्या समोर घडली आहे. अल्पवयीन मुलाने भरधाव वेगात ‘थार’ गाडी चालवत नियंत्रण गमावल्याने पोलीस ठाण्यासमोर हा अपघात झाला. त्यामध्ये दुचाकींचे मोठे नुकसान झाले आहे. सुदैवाने या दैव बलवत्तर म्हणून काही पोलीस व एक तरुणी काही इंचाच्या फरकाने वाचले.याबाबत वाहन मालक नवनाथ पंडित सातव (रा. तांबेवस्ती, केसनंद, ता. हवेली, जि. पुणे) यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलीस हवालदार संतोष तांदळे यांनी सरकारच्या वतीने लोणी काळभोर पोलीस



ठाण्यात फिर्याद दिली आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, १ मे रोजी पहाटे नवनाथ सातव यांच्या मालकीची महिंद्रा कंपनीची ‘थार’ (एमएच १२ व्हीव्ही ४१४१) ही गाडी त्यांच्या नात्यातील १७ वर्षीय अल्पवयीन मुलाला देण्यात आली होती. तो आपल्या तीन मित्रांसह तीर्थक्षेत्र रामदरा येथे दर्शनासाठी गेला होता. दर्शन करून परतत असताना सकाळी सुमारे सात वाजण्याच्या सुमारास लोणी काळभोर गावातील दत्त मंदिर ते लोणी फाटा दरम्यान, पोलीस ठाण्यासमोर येताच चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले.

भरधाव वेग आणि बेदरकार वाहन चालवल्यामुळे थार थेट रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या दुचाकींवर आदळली. या धडकेत शासकीय व खाजगी मिळून एकूण १७ दुचाकींचे मोठे नुकसान झाले. विशेष म्हणजे, चालक अल्पवयीन असून त्याच्याकडे वैध परवाना नसतानाही वाहन देण्यात आल्याने वाहन मालकावरही गुन्हा दाखल




करण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून निष्काळजीपणाबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

लोणी काळभोर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अनेक अल्पवयीन तरुण दुचाकी व चार चाकी चालवत आसताना चारचाकी गाडयांना काळया फिल्मींग लावल्यामुळे गाडी चालवणारा दिसत नाही .त्यामुळे अल्पवयीन मुले गाडी चालवत असताना आतील काही दिसत नाही त्यामुळे पोलिसांनी काळया फिल्मींग काढाव्यात अशी मागणी नागरिकांना केली आहे. शेतकरी गाडयांवर कारवाई पण श्रीमंताच्या गाडयांना सुट अशी पोलिसांची पॉलिसी असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे कशाचीही पर्वा न करता काळया फिल्मींग काढा, अशी चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे.

# महालक्ष्मी सरस मधून १ कोटी लखपती दीदी तयार करण्याचे उद्दिष्ट!

## महिलांसाठी प्रत्येक जिल्ह्यात उमेद मॉल सुरू करणार ; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

मुंबई (दै. संध्या)

■ "महिलांना 50 हजार कोटींचे कर्ज वितरित, एक रुपयाही न थकवता महिलांनी कर्ज फेडले" - मंत्री जयकुमार गोरे




प्रत्येक जिल्ह्यातील महिलेला हक्काच व्यासपीठ देणारे महालक्ष्मी सरस प्रदर्शन आता नव्या रूपात तयार झालं असून, कोणत्याही जागतिक दर्जाच्या प्रदर्शनाची स्पर्धा करण्यासाठी ते सज्ज आहे. या प्रदर्शनात केवळ सजावटीसाठी कंटेनर लावलेले नाहीत तर ते कंटेनर ऑफ इंडिया आहेत, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या नेतृत्वात आत्तापर्यंत ५० लाख लखपती दीदी तयार झाल्या आहेत, येणाऱ्या काळात १ कोटी लखपती दीदी तयार करण्याचं उद्दिष्ट आहे, असं वक्तव्य मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स येथे झालेल्या महालक्ष्मी सरस प्रदर्शनाच्या उद्घाटन सोहळ्यात ते बोलत होते.

महालक्ष्मी सरस विक्री व प्रदर्शन २०२६ सोहळ्याचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते पार पडले. ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे, मंत्री मंगल प्रभात लोढा, राज्यमंत्री योगेश कदम यांच्या प्रमुख उपस्थितीत व ग्रामविकास व पंचायत राज विभागाचे मुख्य सचिव एकनाथ डवले (IAS), मुख्य कार्यकारी अधिकारी उमेद निलेश सागर (IAS), मुख्य परिचालन अधिकारी निखिल ओस्वाल यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.

विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करायचं असेल तर, आपल्या देशातील नारीशक्तीच्या शक्तीचा उपयोग देशाच्या विकासाच्या वाटचालीमध्ये करावा लागेल. ज्या क्षणी ही नारीशक्ती मानव संसाधन म्हणून देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये सहभागी होईल त्या क्षणी भारत विकसित होईल. म्हणूनच मोदीजींनी नारीशक्ती सक्षमीकरणाच्या अनेक योजना या ठिकाणी सुरू केल्या. मला आनंद आहे गेला दहा वर्षात महाराष्ट्रामध्ये उमेद, मवीमच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात महिला बचत गटांची चळवळ उभी राहिली. आणि लाखो महिला या चळवळीशी जोडल्या गेल्या. अनेक कुटुंब लाभार्थी झाली. अनेक महिलांनी स्वतःच्या बळावर बचत गटासोबत आपलं कुटुंब ही सक्षम करण्याचं काम केलं. जे मोदीजींना अपेक्षित होतं ते आमच्या महिलांनी करून दाखवलं असंही मुख्यमंत्री म्हणाले.

आतापर्यंत ५० लाख महिला लखपती दीदी झाल्या आहेत. लवकरच पुढच्या काही वर्षात ही संख्या एक कोटीच्या आकडा पार करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य ठरायला हवे त्यासाठी प्रयत्न करण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या. महाराष्ट्रामध्ये ३०० कोटी झाडे लावण्याची एक मोहीम हातामध्ये घेतली. उमेदच्या माध्यमातून एक योजना तयार करून, त्या योजनेमध्ये बचत गटांना नर्सरी तयार करण्याकरता आपण निधी उपलब्ध करून देऊ, नर्सरी तयार करण्याचे काम महिला करतील आणि त्यासोबत दरवर्षी झाड लावणं आणि त्या झाडांची निगा ठेवून याकरताही जे काही आवश्यक त्याचा खर्च आहे तो खर्चही आपण उपलब्ध करून देऊ. त्यामुळे या महिलांना काम आणि उत्पन्न दोन्ही मिळेल त्यासाठी आराखडा तयार करण्याचा सूचना देखील मुख्यमंत्र्यांनी केल्या आहेत.

ग्रामीण भागातील महिलांना हक्काची कायस्वरूपी बाजारपेठ निर्माण करण्यासाठी २० जिल्ह्यांमध्ये उमेदचे मॉल उभारण्याचे काम आपण सुरू केले असून उरलेल्या १६ जिल्ह्यांमध्ये देखील लवकरच मॉल पुढच्या पाच ते दहा वर्षांमध्ये प्रत्येक तालुक्यात उभारले जाणार असल्याची माहिती ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी दिली आहे.

मुख्यमंत्र्यांच्या भाषणानंतर उपस्थित महिलांना संबोधित करताना मंत्री जयकुमार गोरे म्हणाले की, महालक्ष्मी सरस २०२६ मुळे आमच्या हक्काच्या महिलांना आज रोजगार मिळत आहे. महाराष्ट्रातील इतिहासात पहिल्यांदा इतक्या भव्य स्वरूपात असले महालक्ष्मी सरस प्रदर्शन होत आहे. लाडक्या बहिणींना बळ देण्याचे काम आणि त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहतील या उद्देष्टाने पुढे जात आहोत. देशात ५० टक्के महिला आहेत. आज महिला सगळ्या क्षेत्रात पुढे जात आहेत. उमेदच्या माध्यमातून ६४ लाख कुटुंब यामध्ये सहभागी झाली आहेत. ३४ हजार महिला बचत गट आहेत. ५० हजार कोटी रुपये कर्ज बचत गटाला दिले गेले. आणि हे सर्व कर्ज महिलांनी एक रुपया देखील न थकवता परत केल्याचे म्हणत मंत्री गोरे यांनी महिलांचे कौतुक केले.

मंत्री गोरे पुढे म्हणाले की, मोदींनी लखपती दीदी संकल्प सुरू केली. त्यानंतर आता ३ कोटी महिलांना लखपती करण्याचा संकल्प घेतला आहे. १ कोटी महिला लखपती झाले पाहिजे ही जबाबदारी आमच्या विभागावर दिली आहे. यासाठी आम्ही दिवस रात्र करू पण आपले स्वप्न पूर्ण करून दाखवू. महालक्ष्मी मिनी सरस होतो तेव्हा १००/१५० स्टॉल होते. मात्र, आता १३ जिल्ह्यात फूड मॉल उभारणार आहोत. आमच्या महिला बाजारपेठा सोबत स्पर्धा घेण्यासाठी तयार आहेत. आम्ही महिलांच्या पाठीशी असेच उभे राहू."असे आश्वासन मंत्री जयकुमार गोरे यांनी दिले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### सुरक्षा रक्षक समीर भागोजी कोळवणकर यांना सन्मानित

मुंबई (दैनिक संध्या) : जिल्हाधिकारी कार्यालय मुंबई,शहर जुने कस्टम हाऊस, फोर्ट, मुंबई नं.४००००१ येथे १मे रोजी सकाळी ०७:१५ वाजता महाराष्ट्र दिन आणि जागतिक कामगार दिनानिमित्ताचे औचित्य साधून सुरक्षा रक्षक मंडळाचे सुरक्षा रक्षक समीर भागोजी कोळवणकर यांना त्यांनी केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल कौशल्य व रोजगार मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या शुभहस्ते सन्मानपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.ते सध्या तामिळनाडू मेरकन्टैल बँकेमध्ये कार्यरत आहेत. याप्रसंगी मुंबई शहराचे जिल्हाधिकारी आंचल गोयल (IAS) उपस्थित होते.त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेऊन त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.विक्रोळी कन्नमवार नगर, शिंदे शिवसेनेचे माजी नगरसेवक व विद्यमान बेस्ट समिती सदस्य यांनी समीर कोळवणकर यांचे अभिनंदन केले असून त्यांना भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

### तुकाराम नारायण घरत ज्युनियर कॉलेज ऑफ सायन्स गव्हाण कोपर शाळेचा 100% निकाल

उरण (दैनिक संध्या) : जनार्दन भगत शिक्षण संस्थेच्या तुकाराम नारायण घरत ज्युनियर कॉलेज ऑफ सायन्स गव्हाण कोपर कॉलेजने आपली परंपरा कायम राखली. इयत्ता १२ वी परीक्षेचा निकाल शंभर टक्के लागला आहे.यावर्षी एकूण ७८ विद्यार्थ्यांनी १२ वीची परीक्षा दिली यातील सर्वच्या सर्व विद्यार्थी चांगले गुण मिळवून उत्तीर्ण झाले. म्हात्रे वेदिका राजेश हिने ८३.००% गुण मिळवून प्रथम क्रमांक तर नाईक राहुल महेश याने ७१.१७% गुण मिळवून द्वितीय तर शेख शाहीद खुर्शीद याने ६८.५०% गुण मिळवून शाळेत तृतीय क्रमांक पटकावला .बोर्ड मेंबर महेंद्रशेठ घरत यांनी सर्व उत्तीर्ण मुलांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### उच्च न्यायालयाने केंद्र सरकार व जेएनपीए प्रशासनाला सुनावले खडे बोल

उरण (दैनिक संध्या) : गेली ४० वर्षे प्रलंबित असलेल्या उरण तालुक्यातील शेवा कोळीवाडा पुनर्वसनाचा प्रश्न सुटण्याच्या मार्गावर असून उच्च न्यायाल्यामुळे हा प्रश्न सुटण्याचा मार्ग अधिकच सुकर झाला आहे.उरण तालुक्यातील जवाहरलाल नेहरू बंदर प्रकल्पांमुळे (जेएनपीए) चार दशकांपासून प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत कोणतीही ठोस पावले उचलली नाहीत, तसेच प्रगतीही झाली नसल्याची गंभीर दखल नुकतीच उच्च न्यायालयाने घेतली. तसेच केंद्रीय बंदरे, नौवहन आणि जलमार्ग मंत्रालयाने दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रावरही असमाधान व्यक्त केले. आम्ही प्रतिज्ञापत्रावर समाधानी नाही. या प्रतिज्ञापत्रात केवळ प्रक्रियात्मक आवश्यकता आणि विविध मंत्रालयामधील सल्लामसलतीचा हवाला दिला आहे; परंतु पुनर्वसन प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी कोणतीही ठोस कालमर्यादा नमूद केलेली नाही, अशा शब्दांत न्या. मनीष पितळे आणि न्या. श्रीराम शिरसाट यांच्या खंडपीठाने केंद्रीय बंदरे, नौवहन आणि 'जलमार्ग मंत्रालय, जेएनपीए आणि इतर सरकारी संस्थांना सुनावले. बाधित कुटुंबांनी १९८६ मध्येच विनामूल्य गावठाण जमिनींचा ताबा प्रशासनाकडे सुपूर्द केला होता; मात्र अद्यापही ते पुनर्वसनाच्या प्रतीक्षेत आहेत. त्यामुळे पुनर्वसनासाठी विशिष्ट कालमर्यादा निश्चित होत नाही, तोपर्यंत ही याचिका वर्षानुवर्षे तशीच राहील आणि पुनर्वसनाची वाट पाहणारी याचिकाकर्त्यांची सध्याची पिढीही नाहीशी होईल, असा संतापही न्यायालयाने व्यक्त केला. तसेच प्राधिकरणाने अर्थ मंत्रालयाला दिलेली स्पष्टीकरणे संदिग्ध आणि अपूर्ण असून, त्यामध्ये कोणत्याही ठोस वचनबद्धतेचा अभाव असल्यावर न्यायालयाने बोट ठेवले. तसेच, प्राधिकरणाला संक्रमण शिबिरातील मूलभूत सुविधांची तातडीने पूर्तता करण्याचे आदेश दिले आहेत.या आदेशामुळे शेवा कोळीवाडा प्रकल्पग्रस्तांना खूप मोठा दिलासा मिळाला आहे.शेवा कोळीवाडा येथील प्रकल्पग्रस्त २५६ कुटुंबांच्या पुनर्वसनासंदर्भात मुंबई उच्च न्यायालय येथे दिनांक २२ एप्रिल व २९ एप्रिल २०२६ रोजी झालेल्या सुनावण्यांमध्ये न्यायालयाने जवाहरलाल नेहरू पोर्ट अथॉरिटी तसेच मिनिस्ट्री ऑफ पोर्ट्स, शिपिंग अँड वॉटरवेस , नवी दिल्ली यांना अत्यंत कडक शब्दांत फटकारले.गेल्या तब्बल ४० वर्षांपासून प्रकल्पग्रस्त कुटुंबांचे कायदेशीर पुनर्वसन रखडले असून, एक संपूर्ण पिढी ९१ गुंठयाच्या संक्रमण शिबिरातच व्यतीत झाल्याबद्दल न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली. "हा केवळ प्रशासकीय विलंब नसून मानवी हक्कांचा गंभीर प्रश्न आहे," अशा शब्दांत न्यायालयाने संबंधित प्राधिकरणांना सुनावले.

# आळंदी येथे "विश्वमंगल मराठी फाउंडेशन"चा दिमाखदार शुभारंभ

■ आमदार सुभाष बापू देशमुख यांच्या नेतृत्वाखाली भव्य शुभारंभ सोहळा संपन्न,

■ मराठी शाळा आणि मराठी उद्योगांना जागतिक व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी "विश्वमंगल मराठी फाउंडेशनची स्थापना

पिंपरी-चिंचवड (दै. संध्या)



"विश्वमंगल मराठी फाउंडेशन"चा सामाजिक संदेश घेऊन पंढरपूर ते आळंदी अशी सायकलवारी करणाऱ्या सायकल्स क्लब, पंढरपूरच्या सायकलवीरांचा स्वागत-सन्मान या सोहळ्यात करण्यात आला. त्यांच्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात आले. कार्यक्रमात युवा भारूडकार कृष्णाई उळेकर यांनी सादर केलेला "बुरगुंड" हा समाजप्रबोधनात्मक भारूड कार्यक्रम विशेष आकर्षण ठरला. या भारुडामधून फाउंडेशनची कार्यपद्धती तसेच सामाजिक उपक्रमांची प्रभावी मांडणी करण्यात आली. याशिवाय फाउंडेशनच्या आवाहनाला प्रतिसाद देत महाराष्ट्रातील विविध गावांतील जिल्हा परिषद शाळा दत्तक घेणाऱ्या उद्योजकांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. तसेच आळंदी येथे "विश्वमंगल मराठी फाउंडेशन"ची पहिली स्थानिक समिती स्थापन करण्यात आली असून समितीतील सदस्यांचाही सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचा समारोप भक्तिभावपूर्ण वातावरणात पसायदान गाऊन करण्यात आला. "विश्वमंगल मराठी फाउंडेशन"च्या माध्यमातून मराठी भाषा, संस्कृती आणि सामाजिक विकासासाठी व्यापक स्तरावर कार्य होईल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

आळंदी येथील फ्रुटवाले धर्मशाळा सभागृहात दिनांक १ मे २०२६ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात "विश्वमंगल मराठी फाउंडेशन" चा भव्य शुभारंभ सोहळा पार पडला. या कार्यक्रमाला महाराष्ट्रातील विविध भागांतून तसेच देश-विदेशातून अनेक उद्योजक व प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या शुभारंभ सोहळ्यास माननीय आमदार श्री. सुभाष बापू देशमुख (सोलापूर), प्रख्यात वक्ते व ज्येष्ठ निरुपणकार श्री. विवेकजी घळसासी, तसेच राज्यभरातील अनेक मान्यवर नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून जागतिक स्तरावरील नामांकित उद्योजक श्री. संजय वायाळ (ईशवेद बायोटेक प्रा. लि.), डॉ. उदय भोसले (वैज्ञानिक, लंडन) आणि श्री. आप्पासाहेब कोंढारे (सुवर्ण व्यावसायिक, दुबई) हे विशेषतः परदेशातून उपस्थित राहिले होते.

कार्यक्रमाची सुरुवात आळंदी येथे संत ज्ञानेश्वर महाराजांच्या समाधीचे महापूजन करून करण्यात आली. मंदिर समितीच्या वतीने उपस्थित मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. त्यानंतर वारकऱ्यांच्या उपस्थितीत माऊलींच्या मंदिरापासून सभागृहापर्यंत दिंडी काढण्यात आली. यानंतर सभागृहात मुख्य कार्यक्रमास प्रारंभ झाला. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले तसेच "विश्वमंगल मराठी फाउंडेशन"च्या लोगो व वेबसाईटचे अनावरण करण्यात आले. या सोहळ्यामुळे कार्यक्रमात विशेष उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

प्रास्ताविक भाषणात माननीय आमदार श्री. सुभाष बापू देशमुख यांनी फाउंडेशनची स्थापना करण्यामागील प्रेरणा स्पष्ट केली. मराठी भाषा, मराठी संस्कृती, मराठी शाळा आणि मराठी उद्योगांना जागतिक व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी "विश्वमंगल मराठी फाउंडेशन" कार्यरत राहील, असे त्यांनी सांगितले. तसेच "लोकल टू ग्लोबल" आणि "ग्लोबल टू लोकल" ही संकल्पना विशद करत उपस्थितांना फाउंडेशनच्या कार्यात सक्रिय सहभागी होण्याचे आवाहन केले.

याप्रसंगी आशीर्वादपर शुभ संदेश देताना श्री. विवेकजी घळसासी यांनी माननीय आमदार सुभाष बापू देशमुख यांचा उल्लेख ध्येयवेढा नेतृत्व असा करत लोकमंगल ते विश्वमंगल या गेल्या २८ वर्षांच्या प्रेरणादायी प्रवासाचा गौरव केला. मराठी भाषा, संस्कार, कुटुंबव्यवस्था आणि एकमेकांना मदतीचा हात देण्याची परंपरा जपत महाराष्ट्राला यशस्वी करण्याचे आवाहन त्यांनी केले.

यानंतर परदेशातून आलेल्या मान्यवर उद्योजकांसह उद्योजक परिसंवाद आयोजित करण्यात आला. या परिसंवादात महाराष्ट्रातील नवउद्योजकांना जागतिक पातळीवर उपलब्ध असलेल्या विविध संधींबाबत चर्चा करण्यात आली तसेच उद्योगवाढीच्या मार्गांवर मार्गदर्शन करण्यात आले.

## चाकणला श्री भैरवनाथ यात्रेनिमित्त धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल

चाकण (दै. संध्या)

श्री भैरवनाथ देवस्थान ट्रस्ट व समस्त ग्रामस्थ चाकण यांच्या संयुक्त विद्यमाने चाकण येथे श्री भैरवनाथ यात्रेनिमित्त विविध अशा धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल सुरू आहे. भैरवनाथ यात्रेच्या पार्श्वभूमीवर चाकण येथे प्रारंभी समाज प्रबोधनकार हभप. पोपट महाराज राक्षे यांनी कीर्तन रुपी सेवा केली. त्यानंतर झित्राईमळा येथील झित्राईमाता महिला भजनी मंडळाचा कार्यक्रम संपन्न झाला. विद्या वाचस्पती हभप. डॉ. रविदासजी महाराज शिरसाठ यांचे कीर्तन व येथील सुभाष चौकातील शनेश्वर भजनी मंडळाचा हरी जागराचा कार्यक्रम संपन्न झाला. भागवताचार्य हभप.भगिरथ महाराज काळे यांच्या काल्याच्या किर्तनाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. त्यानंतर येथील श्री भैरवनाथ मंदिरात काल्याच्या महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. व्यासपीठ चालक म्हणून समाज प्रबोधनकार हभप. कल्याण महाराज कल्याणकर यांनी काम पाहिले. मृदंगाचार्य, गायनाचार्य व विणेकरी म्हणून संत रघुनाथ बाबा आश्रमातील विद्यार्थ्यांनी कीर्तनासाठी साथ दिली. दरम्यान, यात्रेनिमित्त मंदिरात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य नितीन गोरे, उद्योजक भरत कानपिळे, यात्रा कमिटीचे अध्यक्ष किसनराव गोरे, धिरज परदेशी, रमेश कांडगे, कालिदास वाडेकर, मंगेश कांडगे आदींनी देवाचा अभिषेक केला.

## नृत्यदिनी स्व. आशा भोसले यांना नृत्यांजली नृत्यतेजकडून कलाकारांचा गौरव

पिंपरी (दै. संध्या)




निगडी येथील नृत्य दिनानिमित्त नृत्यकला मंदिर आणि नृत्यतेज अकादमी संस्थेच्या विद्यार्थिनींनी स्व.आशा भोसले यांच्या अवीट गोड गाण्यांवर ६५ नृत्य कलाकारांनी आपली नृत्य कला सादर करून एक नृत्यातून आदरांजली वाहिली.

यावेळी नृत्यकला मंदिरतर्फे उत्कृष्ट बाल कलाकार म्हणून इशिता बरवड, उत्कृष्ट युवा कलाकार म्हणून सिमरन पवार आणि उत्कृष्ट नृत्यगुरू म्हणून बॉलिवूडचे नृत्य दिग्दर्शक सचिन शिरसाट (किट्टू) यांना पुरस्कार देवून गौरविण्यात आले. तसेच नृत्य शिबिरातील गुणवंत विद्यार्थिनींचा सन्मान करण्यात आला.या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मिस इंडिया ईशा अगरवाल रत्नाकर शेळके, नृत्य गुरू तेजश्री अडिगे, अविनाश अडीगे आदी उपस्थित होते .

आकुर्डीच्या गदिमा सभागृहात, जागतिक नृत्य दिनानिमित्त नृत्य कलाकारांचा गौरव केला . हा सोहळा स्वर्गीय आशाताई भोसले यांना समर्पित केला .या नृत्याच्या सोहळ्यात प्रेक्षक तीन तास रंगून गेले. या कार्यक्रमास प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. नृत्यतेज संस्थेकडून दरवर्षी 15 दिवसांचे नृत्य शिबीर आयोजित केले होते. यामध्ये 5 वर्षांपासून ते पुढे अशा विविध वयोगटातील मुली उपशास्त्रीय, लोकसंगीत, बॉलीवूड, कन्टेमटरी आणि बेली नृत्य आशा विविध नृत्यप्रकारांचं शिक्षण घेतात. 17 एप्रिल ला या शिबिराचा उदघाट्न सोहळा पार पडला. आणि 29 एप्रिल रोजी या शिबिराचा समारोप करण्यात आला .

सर्वप्रथम गणेश वंदना आणि सरस्वती वंदनेने कार्यक्रम सुरु झाला. त्यानंतर बंजारा या नृत्यप्रकारातील झुमका गिरा रे हे नृत्य, लोक संगीतातील नटरंग हे नृत्य, लावणी हा आवडता प्रकार सादर झाला. त्यानंतर बॉलीवूड प्रकारातील नृत्ये सादर झाली. त्यामध्ये शरारा, दिल ले गयी, रंगीला अशी नृत्ये होती. बेली डान्स या प्रकारातील भन्नाट नृत्ये साक्षी तानजे यांच्या दिगदर्शनाखाली मुलींनी सादर केली. कार्यक्रम आशा भोसले यांना समर्पित असल्याने कार्यक्रमाचा शेवट आशा ताईंच्या सुपरहिट नृत्याने झाला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नृत्यगुरू तेजश्री अडिगे करताना म्हणाल्या कि, त्यांनी सर्व पालक आणि विद्यार्थिनींना विविध नृत्य शैलींच महत्व आपल्या भाषणातून पटवून दिले. कार्यक्रमाचे निवेदन प्रियांका जोशी यांनी मनोरंजक पणे केले तर आभार अविनाश अडिगे यांनी मानले.एकूणच स्व.आशा भोसले यांना खऱ्या अर्थाने शब्द आणि नृत्यांची श्रद्धांजली अर्पण करीत जागतिक नृत्य दिन साजरा झाला.

# दिव्यांग बांधवांच्या समावेशक रोजगारासाठी महत्त्वाकांक्षी पाऊल

## 'मिशन संधी आरंभ' उपक्रमाची उद्या होणार सुरुवात

पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका दिव्यांग भवन फाऊंडेशन यांच्या वतीने "मिशन संधी आरंभ" या उपक्रमाचे आयोजन सोमवार ४ मे रोजी वाकड येथील हॉटेल सयाजी येथे करण्यात आले आहे. दिव्यांग बांधवांसाठी स्वयंपूर्ण व शाश्वत एम्प्लॉयर इकोसिस्टम उभारण्याच्या उद्देशाने वर्षभर चालणाऱ्या मोहिमेची ही सुरुवात आहे.

मिशन संधी आरंभ अंतर्गत कॉर्पोरेट क्षेत्रातील वरिष्ठ अधिकारी, एचआर, सीएसआर प्रमुख, स्वयंसेवी संस्था (एनजीओ), सामाजिक कार्यकर्ते तसेच शासकीय अधिकारी यांना दिव्यांग समावेशन व रोजगार या विषयावर संवादासाठी एकत्र आणण्यात येणार आहे. हा उपक्रम केवळ चर्चेपुरता मर्यादित नसून, प्रत्येक सहभागी संस्थेकडून दिव्यांगांच्या उपजीविकेसाठी औपचारिक प्रतिज्ञा घेण्यात येणार आहे.

हा उपक्रम महानगरपालिकेचे महापौर रवि लांडगे तसेच आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात येत आहे. समावेशक विकासासाठी त्यांची असलेली बांधिलकी या उपक्रमातून अधोरेखित होत आहे. याशिवाय, माजी सनदी अधिकारी तथा दिव्यांग भवन फाऊंडेशनचे व्यवस्थापकीय संचालक ओमप्रकाश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली डीबीएफचे सेंटर ऑफ एक्सलन्स दिव्यांग सक्षमीकरणासाठी आदर्श ठरत आहे. इन्क्लुझ्झा, बेंगळुरू ही संस्था नॉलेज पार्टनर म्हणून कार्यरत असून, दिव्यांग समावेशन आणि ऑपर्च्युनिटी मॉडेल संदर्भात मार्गदर्शन करणार आहे. याशिवाय, रोहिणी पीपल टेक्नॉलॉजी प्रा. लि. ही संस्था इम्प्लिमेंटेशन पार्टनर म्हणून कार्य पाहणार असून, कॉर्पोरेट संपर्क, सहभाग समन्वय व प्रत्यक्ष अंमलबजावणीची जबाबदारी पार पाडणार आहे.

'संधी' संकल्पनेद्वारे कॉर्पोरेट क्षेत्राद्वारे दिव्यांगांना एक व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या माध्यमातून त्यांना रोजगार, इंटर्नशिप, प्रोक्युअरमेंट आणि लीडरशिप या सर्व स्तरांवर दिव्यांगांचा समावेश करण्यासाठी व्यावहारिक मार्ग उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

> दिव्यांग बांधवांना मुख्य प्रवाहात आणणे ही केवळ सामाजिक जबाबदारी नसून ती आपल्या विकासाचा अविभाज्य भाग आहे. 'मिशन संधी'च्या माध्यमातून कॉर्पोरेट क्षेत्र आणि दिव्यांग यांच्यातील दरी कमी करून त्यांना रोजगार, कौशल्य आणि स्वावलंबनाच्या संधी उपलब्ध करून देण्याचा आमचा ठाम प्रयत्न आहे. समावेशक आणि सक्षम शहर घडविण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे.
>
> **- रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

> मिशन संधी आरंभ' हा उपक्रम सकारात्मक बदलाची सुरुवात आहे. या उपक्रमातून प्राप्त झालेल्या बांधिलकीचे रूपांतर प्रत्यक्ष रोजगाराच्या संधींमध्ये करण्यासाठी आम्ही कटिबद्ध असून, दिव्यांग सक्षमीकरणासाठी ठोस आणि परिणामकारक काम करण्यावर आमचा भर राहील.
>
> **– ओमप्रकाश देशमुख, व्यवस्थापकीय संचालक, दिव्यांग भवन फाऊंडेशन**

### मोहिमेचे प्रमुख घटक

- मिशन संधी : कॉर्पोरेट एंगेजमेंट व प्लेज उपक्रम
- संधी सक्षम : लायझन ऑफिसर प्रशिक्षण व इक्वल ऑपर्च्युनिटी पॉलिसी
- संधी मेळा : दिव्यांग व कॉर्पोरेट यांच्यात तिमाही संपर्क उपक्रम

> प्रत्येक नागरिकाला समान संधी मिळेल असे शहर उभारण्याचा आमचा संकल्प आहे. 'मिशन संधी' हा उपक्रम समावेशक रोजगाराच्या दिशेने उचललेला महत्त्वपूर्ण टप्पा असून, याच्या माध्यमातून दिव्यांग बांधवांना मुख्य प्रवाहात आणण्यास निश्चितच गती मिळेल.
>
> **– डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

## थोडक्यात पण महत्वाचे...



### कुलदैवत खंडोबा मंदिरात मोगरा महोत्सव साजरा

जेजुरी (दैनिक संध्या) : रविवार दि 3 मे रोजी महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या जेजुरी गडावर खंडोबा मंदिरात मोगरा महोत्सव साजरा करण्यात आला. दरवर्षी महाराष्ट्राचे कुलदैवत आणि बहुजन समाजाचा लोकदेव असणाऱ्या खंडोबा मंदिरात मोगरा महोत्सव तर सभामंडपात झेंडूच्या फुलांची सजावट करण्यात आली आहे.मोगरा आणि झेंडूच्या फुलांची ही सजावट भाविकांना आनंददायी वाटून गेली. महाराष्ट्राचे कुलदैवत जेजुरीच्या खंडोबा देवाचे गुरव, कोळी, वीर, घडशी समाज संघटना, जेजुरी व श्री मार्तंड देवसंस्थान, जेजुरी यांच्या वतीने श्री खंडोबा मंदिर मुख्य गाभारा मध्ये मोगरा फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली. जेजुरीच्या खंडोबा मंदिरातील मोगरा फुलांची सजावट खंडोबा देवाचे पुजारी गणेश आगलावे,ऋषिकेश सातभाई, दीपक बारभाई, मयूर दीड भाई,सचिन मोरे,वैभव लांघी, सतीश कदम, तसेच खंडोबा भाविक कृष्णा ठाकूर आणि निलेश गोडसे रा.सोळू, खेड यांच्या सहकार्यातून करण्यात आली.

### श्री शिव छत्रपती महाविद्यालयाची उज्वल निकालाची परंपरा कायम

जुन्नर (दैनिक संध्या) : पुणे जिल्ह्याच्या ग्रामीण व आदिवासी भागातील छपन्न वर्षांची उज्वल यशाची परंपरा असणारे जुन्नर तालुका शिवनेर शिक्षण प्रसारक मंडळाचे श्री शिव छत्रपती महाविद्यालय, जुन्नर हे एक अग्रगण्य महाविद्यालय आहे. इ. १२ वी बोर्ड परीक्षा २०२६ या वर्षात महाविद्यालायातील विद्यार्थ्यांनी दैदिप्यमान निकालाची परंपरा कायम राखली, अशी माहिती प्राचार्य एम.बी वाघमारे यांनी दिली. तसेच संस्कृत विषयामध्ये १२ वी विज्ञान या शाखेतील विद्यार्थिनी कु. गौरी सुमंत मेहेर व आय.टी. विषयामध्ये १२ वी वाणिज्य शाखेतील कु. इवाना एलियास शेख यांना १०० पैकी १०० गुण मिळाले आहेत. सर्व परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. संस्थेचे अध्यक्ष, मा. अँड संजय शिवाजीराव काळे साहेबांनी त्यांचे कौतूक करून त्यांना बुके व पेढे देऊन सत्कार केला. सदर प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष प्रतिनिधी मा. प्रा. व्ही. बी. कुलकर्णी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. बी. वाघमारे, उपप्राचार्य प्रा. डॉ. आर. डी. चौधरी, समन्वयक कनिष्ठ महाविद्यालय प्रा. पी. एस. लोढा, पर्यवेक्षक प्रा. एस. ए. श्रीमंते, एम. सी. व्ही. सी. प्रमुख प्रा. के. जी. नेटके व सर्व प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी यांनी आपल्या महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.




### आळंदीत 'विश्वमंगल मराठी फाउंडेशन'चा दिमाखदार शुभारंभ

आळंदी (दैनिक संध्या) : मराठी भाषा, संस्कृती, शाळा व उद्योगांना जागतिक व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने "विश्वमंगल मराठी फाउंडेशन"चा भव्य शुभारंभ येथील फ्रुटवाले धर्मशाळा सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. आमदार सुभाष बापू देशमुख यांच्या नेतृत्वाखाली पार पडलेल्या या सोहळ्यास राज्यभरातून तसेच देश-विदेशातून उद्योजक, मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमापूर्वी संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या समाधीचे महापूजन करून दिंडी काढण्यात आली. कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून विवेकजी घळसासी, संजय वायाळ, डॉ.उदय भोसले व आप्पासाहेब कोंढारे उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन, फाउंडेशनच्या लोगो व संकेतस्थळाचे अनावरण करण्यात आले. प्रास्ताविकात आमदार देशमुख यांनी "लोकल टू ग्लोबल" व "ग्लोबल टू लोकल" ही संकल्पना मांडत मराठी शाळा व उद्योगांना जागतिक स्तरावर पोहोचविण्यासाठी फाउंडेशन कार्यरत राहील, असे सांगितले. यावेळी विवेकजी घळसासी यांनी देशमुख यांच्या २८ वर्षांच्या लोकमंगल ते विश्वमंगल प्रवासाचा गौरव करत मराठी संस्कार व परंपरा जपण्याचे आवाहन केले. यानंतर आयोजित उद्योजक परिसंवादात नवउद्योजकांना जागतिक संधींबाबत मार्गदर्शन करण्यात आले. पंढरपूर ते आळंदी सायकलवारी करणाऱ्या सायकलवीरांचा सन्मान करण्यात आला. तसेच कृष्णाई उळेकर यांच्या समाजप्रबोधनात्मक भारुडाने कार्यक्रमात रंगत आणली. विविध गावांतील जिल्हा परिषद शाळा दत्तक घेणाऱ्या उद्योजकांचा गौरव करण्यात आला असून आळंदी येथे फाउंडेशनची पहिली स्थानिक समिती स्थापन करण्यात आली. कार्यक्रमाचा समारोप पसायदानाने करण्यात आला.

### शिरूरला उपजिल्हा रुग्णालयासाठी प्रिया बिरादार यांचे बेमुदत उपोषण

शिरूर (दैनिक संध्या) : शहरातील विविध प्रलंबित प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी भाजपा महिला आघाडीच्या शिरूर शहराध्यक्षा प्रिया बिरादार या सोमवारपासून बेमुदत उपोषणास बसणार आहेत. शिरूर तहसील कार्यालयासमोर हे उपोषण सुरू होणार असून, समाजहिताच्या मागण्यांसाठी हा लढा उभारण्यात आला आहे. शहरात १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयासाठी जागेचा परिपूर्ण प्रस्ताव तातडीने सादर करावा, चुकीचा प्रस्ताव सादर करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करावी, तसेच शहर व तालुक्यात अधिकृत शासकीय आधार केंद्रे सुरू करावीत, अशा प्रमुख मागण्या या आंदोलनातून करण्यात येत आहेत. तसेच सीएससी केंद्रांवरील शुल्काबाबत पारदर्शकता ठेवावी, बंद असलेल्या आधार केंद्रांची जबाबदारी निश्चित करून संबंधितांवर कारवाई करावी, आणि प्रशासनाने या गंभीर प्रश्नांकडे तातडीने लक्ष द्यावे, अशीही मागणी करण्यात आली आहे. दि. ४ मे रोजी सकाळी ११ वाजता शिरूर तहसील कार्यालय येथे या बेमुदत उपोषणास सुरुवात होणार असून, प्रिया बिरादार यांच्या नेतृत्वाखाली नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# मोटरसायकल चोरीच्या गुन्ह्यांचा यशस्वी छडा लावत प्रभावी कामगिरी; बारामती शहर पोलीसांची कामगिरी

बारामती (दै. संध्या)

बारामती शहर पोलीस स्टेशनच्या तपास पथकाने मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्यांचा यशस्वी छडा लावत पुन्हा एकदा प्रभावी कामगिरी बजावली आहे. बारामती शहर पोलीस स्टेशन गु.र.नं. 0166/2026, भारतीय न्याय संहिता (BNS) कलम 303(2) प्रमाणे दाखल असलेल्या गुन्ह्याचा तपास सुरू असताना पोलीस हवालदार श्री.यशवंत पवार (तपासी अंमलदार) यांना गोपनीय बातमीदारामार्फत अशी खात्रीशीर माहिती मिळाली की,एक इसम चोरीच्या मोटारसायकली वापरत असून त्या विविध ठिकाणी लपवून ठेवत आहे.या माहितीची पडताळणी करून तात्काळ कारवाई करण्यात आली व सापळा रचून आरोपी नामे ऋषिकेश पिंटू मंडले (रा. निरजणी, ता.माळशिरस,जि.सोलापूर) यास ताब्यात घेण्यात आले.

सखोल चौकशी केली असता त्याच्यासोबत एका अल्पवयीन विधी संघर्ष बालकाचा सहभाग देखील असल्याचे निष्पन्न झाले. पुढील तपासात आरोपीने विविध ठिकाणी लपवून ठेवलेल्या चोरीच्या वाहनांबाबत माहिती दिली. या माहितीच्या आधारे तपास पथकाने वेगवेगळ्या ठिकाणी जाऊन शोधमोहीम राबवली व कौशल्यपूर्ण तपास करून चोरीच्या वाहनांची यशस्वी रिकव्हरी केली.

या कारवाईदरम्यान बारामती शहर पोलीस स्टेशन हद्दीतील वरील नमूद गुन्ह्याबरोबरच बारामती तालुका पोलीस स्टेशन हद्दीतील दोन वाहन चोरीचे गुन्हे तसेच वेळापूर पोलीस स्टेशन (जि.सोलापूर ग्रामीण) हद्दीतील एक वाहन चोरीचा गुन्हा अशा



एकूण चार गुन्ह्यांमधील मुद्देमाल आरोपी नामे ऋषिकेश पिंटू मंडले याच्याकडून जप्त करण्यात आला. रिकव्हर करण्यात आलेल्या वाहनांमध्ये यामाहा कंपनीची RXG मोटारसायकल,हिरो होंडा स्प्लेंडर मोटारसायकल,यामाहा कंपनीची आणखी एक मोटारसायकल तसेच होंडा कंपनीची अॅक्टिवा स्कुटी यांचा समावेश आहे. सदर कारवाईमुळे विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील चोरीचे गुन्हे उघडकीस येऊन त्यांची यशस्वी निर्गती करण्यात आली आहे. कारवाई अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने राबविण्यात आली असून पोलीस हवालदार श्री.यशवंत पवार (तपासी अंमलदार) यांच्या नेतृत्वाखाली तपास पथकातील पोलीस शिपाई अक्षय सिताफ, पोलीस हवालदार रामचंद्र शिंदे, पोलीस शिपाई अमोल देवकाते, पोलीस शिपाई गिरीश नेवसे,पोलीस शिपाई पोपट कवितके,पोलीस शिपाई विशाल शिंदे,पोलीस शिपाई सागर जामदार तसेच सहा.पोलीस उपनिरीक्षक श्री.संदीप जाधव यांनी रात्रंदिवस मेहनत घेऊन ही कामगिरी यशस्वी केली आहे.तपासाचे मार्गदर्शन पोलीस उपनिरीक्षक श्री. रत्नदीप भंडारे यांनी केले.

सदर उल्लेखनीय कामगिरी मा. पोलीस अधीक्षक श्री. संदीप सिंह गिल्ल,मा.अपर पोलीस अधीक्षक श्री. गणेश बिरादार,मा.उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. सुदर्शन राठोड तसेच प्रभारी पोलीस निरीक्षक श्री. श्रीशैल चिवडशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली आहे.

> या कारवाईमुळे मोटारसायकल चोरी करणाऱ्या चोरट्यांवर प्रभावी वचक बसला असून नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना अधिक बळकट झाली आहे.बारामती पोलीस नागरिकांना आवाहन करीत आहेत की, वाहन पार्क करताना योग्य लॉकचा वापर करावा, शक्यतो सुरक्षित व CCTV असलेल्या ठिकाणी वाहन उभे करावे तसेच संशयास्पद हालचाली आढळल्यास तात्काळ पोलीसांना माहिती द्यावी. थोडीशी खबरदारी घेतल्यास अशा गुन्ह्यांना आळा घालणे शक्य आहे.
> - प्रभारी पोलीस निरीक्षक, बारामती शहर पोलीस स्टेशन

## नसरापूरचा आक्रोश! चिमुरडीवरील अत्याचार आणि हत्येच्या निषेधार्थ सलग तिसऱ्या दिवशी कडकडीत बंद

नसरापूर (दै. संध्या)

नसरापूरमध्ये एका साडेतीन वर्षाच्या चिमुरडीवर एका नराधम वयोवृद्धाने दगडाने ठेचून खून केल्याची घटना घडल्याने सलग तिसऱ्या दिवशी देखील नसरापूर व्यापारी व ग्रामस्थानी अत्यावश्यक सेवा वगळता बाजारपेठ बंद ठेवून शासनाचे लक्ष वेधून घेतले आहे. तर सायंकाळी बाजारपेठ सुरू करण्याचा निर्णय ग्रामस्थ व्यापारी संघटनेच्या वतीने घेण्यात आला.

भोर आणि राजगड तालुक्याला जोडणारी महत्त्वाची बाजारपेठ असणाऱ्या गावात भीमाजी कांबळे वय ६५ या नराधम आरोपीने एका साडेतीन वर्षाच्या मुलीला गोठ्यातील पत्रा वजा शेडमध्ये नेऊन खून केला. ही घटना शुक्रवारी साडेतीन वर्षाच्या सुमारास घटना घडली होती. या निषेधार्थ दोन दिवस पुणे सातारा महामार्ग रास्तारोको आंदोलन घटनेनंतर तिसऱ्या दिवशी सुद्धा नसरापूर बाजारपेठ बंद ठेवण्यात आली. नसरापूर व्यापारी संघटना व ग्रामस्थांची निषेधार्थ बैठक घेण्यात आली.

या बैठकीत नसरापूर बाजारपेठ रविवारी सायंकाळी बाजारपेठा सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. यापुढे गाव बंद अथवा इतर अफवा सदृश सोशल मीडियावर येणाऱ्या निनावी संदेशाकडे लक्ष न देता ग्रामस्थ आणि व्यापारी संघटनेने घेतलेल्या निर्णयाचे संदेशाचेच पालन करण्याचे आवाहन व्यापारी संघटनेच्या वतीने करण्यात आले.

नसरापूरमध्ये झालेल्या घटनेच्या पार्श्वभूमीवर गेल्या तीन दिवसापासून मोठा पोलीस बंदोबस्त करण्यात आल्याने नसरापूर छावणीचे स्वरूप आले आहे. बंदोबस्तासाठी तैनात करण्यात असलेल्या पोलीस पथकाला अल्पोपाहार व पिण्याचे पाण्याची व्यवस्था व्यापारी संघटनेच्या वतीने करण्यात आली होती.

## पुरंदरची आर्या भोसले 'जीएसपीआय' साठी पात्र

सासवड (दै. संध्या)

जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर पुरंदर तालुक्यातील माहूर येथील आर्या मोरेश्वर भोसले हिने 'जीएसपीआय' या अत्यंत प्रतिष्ठेच्या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी निवड होऊन तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. सैन्य दलात अधिकारी होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या राज्यातील हजारो मुलींमधून केवळ ३० मुलींची निवड केली जाते, त्यामध्ये आर्याने आपले स्थान निश्चित केले आहे.

आर्याचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण सासवडच्या शिवाजी इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये झाले.



नुकत्याच लागलेल्या दहावीच्या (सीबीएसई) परीक्षेत तिने ९६.२% गुण मिळवून आपल्या बुद्धिमत्तेची चुणूक दाखवून दिली होती. अभ्यासातील सातत्य आणि एनडीए कडे जाण्याचा ध्यास यामुळेच तिला हे यश संपादन करता आले आहे.

जीएसपीआय हा उपक्रम नॅशनल डिफेन्स अकॅडमी मध्ये प्रवेश मिळवू इच्छिणाऱ्या मुलींसाठी एक अत्यंत महत्त्वाचा टप्पा मानला जातो. छत्रपती संभाजीनगर येथील संस्थेमार्फत या मुलींना लष्करी अधिकारी बनण्याचे विशेष प्रशिक्षण दिले जाते. या प्रशिक्षणासाठी अत्यंत कठीण निवड चाचणी पार करावी लागते, यामध्ये केवळ निवडक मुलींचीच निवड होते.

आर्याच्या या यशाबद्दल तिचे सर्वत्र कौतुक होत आहे. भविष्यात एनडीएच्या परीक्षेत घवघवीत यश मिळवून देशाच्या संरक्षण दलात अधिकारी म्हणून सेवा बजावण्याचा तिचा मानस आहे.

## वृत्तपत्र लेखकांचे काम समाजासाठी जागल्यांचे- पद्मश्री उदय देशपांडे, मधू शिरोडकर यांच्या 'कालप्रवाह'पुस्तकाचे प्रकाशन

पुणे (दै. संध्या)

समाजासाठी एखादी गोष्ट चांगली असो वा वाईट हे दृष्टीस पडल्यानंतर वृत्तपत्र लेखक अधिक अस्वस्थ होतो.हातात लेखणी घेऊन ती घटना किंवा लोकांना भेडवसणारी समस्या तो लिहितो आणि एखाद्या दैनिकाकडे पाठवत नाही तोपर्यंत त्याला झोप येणार नाही, भले ते छापून येईल कि नाही याची पर्वा त्याला नसते.परंतु समाजातल्या जागल्याची भूमिका घेत आपण व्यक्त होऊ शकतो. याचे तुम्हाला समाधान असते.

मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबई ही संस्था महाराष्ट्रातील अशा हजारो जागल्यांना एकत्र करुन सातत्याने कार्यक्रम, उपक्रमांच्या माध्यमातून गेल्या७५वर्षाहून अधिक काळ चळवळीच्या रुपात कार्यरत आहे.समाजाच्या दृष्टीने हे काम महत्त्वाचे आहे, असे उद्गार पद्मश्री उदय देशपांडे यांनी काढले. मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबईचे माजी अध्यक्ष जेष्ठ वृत्तपत्र लेखक



मधू शिरोडकर यांच्या कालप्रवाह या पुस्तकाचे प्रकाशन नुकतेच दादर येथे नवशक्तीचे संपादक प्रकाश सावंत आणि माजी संपादक प्रकाश कुलकर्णी यांच्या हस्ते पार पडले त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

वृत्तपत्र लेखक आणि नवशक्ती जमका सदर यांचे ऋणानुबंध प्रभाकर यांच्या काळापासून गेली ७५ वर्षे आहेत. दररोज सर्वाधिक पत्रे नवशक्तीकडे येतात हे नाते जपण्यासाठी त्यांना आमच्याकडून पूर्ण पानभर प्रसिद्धी दिली जाते.यापुढच्या काळात वृत्तपत्र लेखकांकडून अभ्यासपूर्ण परंतु परखडपणे लिहावे अशीही आमची इच्छा आहे असे आवाहन नवशक्तीचे संपादक प्रकाश सावंत यांनी सांगितले.

मधू शिरोडकर यांचे पत्रलेखक आणि वृत्तपत्र लेखक संघासाठी कीती महत्त्वाचे आहे याचे विवेचन नवशक्तीचे माजी संपादक प्रकाश कुलकर्णी यांनी केले. वाचकांची मते किती महत्त्वाची आहे हे स्पष्ट करताना जगभरातील वर्तमानपत्रांमध्ये संपादकीय पानावर अनेक सुप्रसिद्ध लोकांनी केले आहे, चर्चिल आणि आणि ब्रिटिश साहित्यिकांचे दाखल त्यांना यावेळी दिले.जेष्ठ साहित्यिक अशोक बेंडखळे यांनी संस्थेचा पत्रवृत्तांत लिहिताना संस्थेची वाटचाल आणि इतिहास कसा प्रगल्भ आहे हे सांगितले.

संघाचे अध्यक्ष रवींद्र मालुसरे यांनी प्रास्ताविक केले तर कार्यक्रम प्रमुख दिगंबर चव्हाण यांनी सुत्रसंचलन आणि माजी अध्यक्ष मनोहर साळवी यांनी आभार प्रदर्शन केले. महाराष्ट्र राज्य आणि मराठी माणसांचे मूलभूत प्रश्न सातत्याने सेवाभावीवृत्तीने व निर्भीडपणे आपल्या लेखणीतून सातत्याने पदरमोड करुन जनजागृती हे जे काम करीत आहेत अशा पत्रलेखकांचा संघाच्या वतीने"निर्भीड जागल्या"पुरस्कार प्रदान करुन यावेळी सन्मानित करण्यात आले. तर पत्रस्पर्धेतील यशस्वी ठरलेल्या विजय ना कदम, मधुकर कुबल, नीशा शेरे, रामचंद्र मेस्त्री, प्रा.जयवंत पाटील यांना प्रशस्तीपत्र देण्यात आले.

## दिवसाच्या वीजवापरात ७० लाख ग्राहकांना २२३५ कोटी रुपयांचा लाभ

पुणे (दै. संध्या)

राज्यातील वीज ग्राहकांना सकाळी ९ ते सायंकाळी ५ या कालावधीतील वीजवापरासाठी टीओडी (टाइम ऑफ डे) सवलत जुलै २०२५ मध्ये लागू केल्यापासून आतापर्यंत ७० लाख ग्राहकांना एकूण २२३५ कोटी रुपयांचा लाभ झाला असून त्यामध्ये १५,९०७ उच्चदाब औद्योगिक ग्राहक एकूण १५३४ कोटी रुपयांच्या लाभासह प्रथम स्थानावर आहेत, अशी माहिती महावितरणतर्फे देण्यात आली.

विजेचा वापर कोणत्या वेळेत झाला त्याच्या आधारे वीजदरात सवलत दिली जाते त्याला टीओडी सवलत म्हणतात. राज्यात जुलै २०२५ पासून १० किलोवॅटपेक्षा जास्त भार असलेल्या औद्योगिक व वाणिज्यिक वीज ग्राहकांना सकाळी ९ ते सायंकाळी ५ या कालावधीतील वीज वापरासाठी सवलत देण्यात आली. या ग्राहकांना एप्रिल ते सप्टेंबर या महिन्यांसाठी १५ टक्के तर ऑक्टोबर ते मार्च या महिन्यांसाठी २५ टक्के इतकी मोठी सवलत देण्यात येत आहे.

सर्व घरगुती ग्राहकांनाही प्रथमच टीओडी सवलतीचा लाभ देण्यास सुरुवात झाली असून चालू आर्थिक वर्षात सकाळी ९ ते सायंकाळी ५ या कालावधीतील वीजवापरासाठी प्रती युनिट ८५ पैसे सवलत देण्यात येते. औद्योगिक ग्राहकांमध्ये उच्च दाब औद्योगिक ग्राहक, उच्चदाब हंगामी औद्योगिक ग्राहक, लघुदाब औद्योगिक ग्राहक आणि यंत्रमाग असा एकत्रित विचार केला तर ४३,९११ औद्योगिक ग्राहकांना एकूण १,७७४ कोटी रुपयांचा लाभ झाला आहे. राज्यातील उच्चदाब व लघुदाब अशा ११,०१७ वाणिज्यिक ग्राहकांना एकूण २३९ कोटी रुपयांचा लाभ झाला आहे.

घरगुती ग्राहकांना टीओडीचा लाभ मिळण्यास सुरुवात झाल्यापासून त्यांना १,०९६ दशलक्ष युनिट इतक्या विजेसाठी ८९ कोटी रुपयांचा लाभ झाला आहे. या कालावधीतील लाभधारक घरगुती ग्राहकांची संख्या ६९,३५,३८८ इतकी होती.

# ब्रिटिश संसदेत 'अॅल्युमिनियम मॅन ऑफ इंडिया' भरत गीते यांना 'हाऊस ऑफ कॉमन्स', 'ग्लोबल इन्स्पिरेशन ऑफ द इयर २०२६' पुरस्कार

पुणे (दै. संध्या)

मराठी उद्योजक व तौरल इंडियाचे संस्थापक भरत गीते यांना ब्रिटिश पार्लमेंटमधील प्रतिष्ठित 'ग्लोबल इन्स्पिरेशन ऑफ द इयर २०२६' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच गीते यांना 'हाऊस ऑफ कॉमन्स' या विशेष सन्मानानेही गौरविण्यात आले. 'अॅल्युमिनियम मॅन ऑफ इंडिया' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गीते यांच्या कार्याचा जागतिक स्तरावर झालेला हा गौरव भारताच्या उद्योगविश्वासाठी आणि महाराष्ट्रासाठी अभिमानास्पद ठरला आहे.




लंडन येथील ब्रिटिश संसदेच्या पोर्टक्युलिस हाऊसमधील बुथरॉईड कक्षात हा सोहळा नुकताच पार पडला. दक्षिण आशियाई वाणिज्य व उद्योग मंडळाच्या वतीने गुजरात आणि महाराष्ट्र स्थापना दिनानिमित्त हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. उद्योगपती अलोक किर्लोस्कर यांनाही याच पुरस्काराने गौरविण्यात आले. दोन्ही उद्योजकांच्या कार्यामुळे या सन्मानाचे महत्त्व अधिक अधोरेखित झाले. या कार्यक्रमास ब्रिटनचे खासदार लुईस फ्रेंच, मराठी मंडळ लंडनचे सुशील गायकवाड, लॉर्ड रामिंडेर रेंजर, ओशियन अँड नॅचरल रिसोर्सेस संचालनालयाचे वरिष्ठ वाणिज्य संचालक सुरेश यादव, साऊथ एशियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजचे चेअरमन महेंद्रसिंह जडेजा आदी उपस्थित होते.

भरत गीते यांनी उद्योगातील नावीन्य, दूरदृष्टी आणि गुणवत्ता यांच्या जोरावर अॅल्युमिनियम क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केली आहे. 'आत्मनिर्भर भारत' या संकल्पनेला केंद्रस्थानी ठेवत त्यांनी उद्योग उभारला असून, देशाच्या औद्योगिक प्रगतीत मोलाचे योगदान दिले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली उभारलेल्या तौरल इंडिया कंपनीमार्फत चाकण आणि सुपा येथील उत्पादन केंद्रांतून अॅल्युमिनियम कास्टिंगचा पुरवठा देश-विदेशातील विविध औद्योगिक क्षेत्रांना केला जात आहे.

ब्रिटिश संसदेच्या ऐतिहासिक परिसरात मिळालेला हा सन्मान केवळ भरत गीते यांच्या कार्याचा गौरव नसून, भारतीय उद्योजकतेच्या जागतिक यशाचा ठसा मानला जात आहे. गीते यांचा हा सन्मान नवउद्योजकांसाठी प्रेरणादायी ठरत असून, 'स्थानिक ते जागतिक' या प्रवासाचा तो एक उत्तम आदर्श ठरला आहे.